मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५४ ■ बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल महानगरपालिकेच्या महापौरपदी नितीन पाटील आणि उपमहापौरपदी प्रमिला पाटील बिनविरोध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : पनवेल महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजप महायुतीचे नितीन जयराम पाटील तर उपमहापौरपदी प्रमिला रविनाथ पाटील यांची आज (मंगळवार, दिनांक १०) बिनविरोध निवड झाली. शेकाप महाविकासआघाडीकडे पक्षीय बलाबल नसल्याने अखेरी त्यांना आपले उमेदवारी अर्ज मागे घ्यावे लागले. सार्वत्रिक निवडणुकीत या पूर्वीच दारुण पराभव झाल्याने महापौर उपमहापौर निवडणुकीतसुद्धा नाचक्की होऊ नये यासाठी महाविकास आघाडीला पर्याय शिल्लक राहिला नव्हता. भाजप युतीकडे स्पष्ट बहुमत असल्याने या निवडणुकीत फक्त औपचारिकता बाकी होती. निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. यामध्ये ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले.

या निवडीनंतर पनवेल शहरात भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून जल्लोष करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या आणि 'एकच वादा प्रशांत दादा' गजरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महारांच्या अश्वारूढ पुतळ्यास आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर,





आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२६ भाजप महायुतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली लढवली. या निवडणुकीत भाजपने ५५, शिवसेनेने २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह पनवेल महानगरपालिकेवर पुन्हा




एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली. नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांनी पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्याने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.या प्रसंगी बोलताना नितीन पाटील यांनी सांगितले की, पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण तसेच वाहतूक व्यवस्थेच्या बळकटीकरणावर भर देण्यात येईल. नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवण्यासाठी पारदर्शक आणि गतिमान प्रशासन देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी नमूद केले. या संपूर्ण विजयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि समस्त मतदार पनवेलकरांचे मनःपूर्वक आभार मानले. सर्वांनी नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

महापौर नितीन पाटील यांना आदराने 'भाई' म्हणून संबोधले जाते. पनवेल तालुक्यातील कासारभाट त्यांचे मुळगाव. सामाजिक कार्य चालवत पुढे त्यांनी राजकारणात पदार्पण केले. दोन वेळा नगरसेवक म्हणून जबाबदारीने काम केले. सभागृहातील त्यांचा अनुभव, विषयांची सखोल मांडणी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. जनसंपर्क व्यापक व मजबूत आणि नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी तत्पर. भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी संघटनात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पनवेल विधानसभा निवडणुकीत निवडणूक प्रमुख म्हणून त्यांनी केलेले नियोजन, समन्वय आणि नेतृत्व पक्षाच्या यशात महत्त्वाचे ठरले आहे. सामाजिक कार्याची आवड असल्याने ते



**जानेवारी महिन्यात पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत पराभवाचा धक्का सावरत नाही तोच काल झालेल्या जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत शेकाप महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. आणि या निवडणुकीत पनवेल पंचायत समितीमध्येही शेकापचे अस्तित्व संपुष्टात आले. एक अर्थाने जनतेने शेकापला सपशेल नाकारले आहे. आणि त्याचा उत्साह आज झालेल्या रॅलीच्या जल्लोषातून येत होता.**

सुरुवातीपासूनच विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय राहिले आहेत. अभिनव मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष तसेच 'जाणीव' या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून शिक्षण, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत.त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर महापौर पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली असून आगरी समाजाचा पहिला महापौर म्हणून त्यांनी सन्मान मिळविला आहे.

उपमहापौर प्रमिला पाटील ह्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांतिभूमी शिरढोण गावाची लेक आहे. भाजप कळंबोली मंडलच्या खजिनदार व सामाजिक कार्यकर्त्या प्रमिला पाटील यांनी आपल्या कार्यातून कळंबोलीच्या राजकारणात ओळख निर्माण केली आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक-सामाजिक सबलीकरण करत त्यांनी शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळात पोहोचवल्या.नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ०७, ०८ व ०९ मधून भाजप महायुतीचे १२ पैकी १२ उमेदवार विजयी झाले. प्रभाग ०७ मधून प्रमिला पाटील यांनी विद्या गायकवाड यांचा पराभव केला. त्यांच्या सामाजिक कार्य व संघटन कौशल्यामुळे त्यांना उपमहापौरपदाची संधी मिळाली आहे.

## लोखंडी पूल धोक्यात! रस्त्याचे तीनतेरा अजय मोतीवारांचा प्रशासनाला इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक दरम्यानचा रस्ता अक्षरशः खड्डेमय झाला असून या मार्गावरील लोखंडी पूल अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे. कुठल्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या रस्त्याची व पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते अजय मोतीवार यांनी केली आहे.

दि. ९ फेब्रुवारी रोजी नगर परिषद मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून वाहनधारक व पादचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. लोखंडी पुलाची अनेक ठिकाणी पडझड झाली असून तो पूर्णतः धोकादायक बनला आहे.

या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे



उडणाऱ्या गिट्टी, माती व धुळीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांचे नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यासही धोका निर्माण होत आहे. त्यामुळे सदर रस्ता व पूल तात्काळ दुरुस्त करावा, अन्यथा जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा अजय मोतीवार यांनी दिला आहे.

निवेदन देताना प्रतीक कांबळे, भुषण देशपांडे, हरिश सभादिंडे, शेख ताजू ठेकेदार, अब्दुल पठाण, संध्याताई सभादिंडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या सुषभीकरणासाठी नगरपरिषदेकडे ठोस मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी/प्रकाश गवारे** : मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसराचे सुशोभीकरण तातडीने करण्यात यावे तसेच त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी बौद्ध बांधवांनी नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात पुतळ्याच्या परिसरात स्वच्छता, रंगरंगोटी, प्रकाशव्यवस्था, सुशोभीकरण, सी.सी. रस्ता, नाल्यांची दुरुस्ती, समाजमंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम तसेच दलित वस्ती परिसरातील अपूर्ण विकासकामांसाठी तातडीने निधी मंजूर करून कामे सुरू करावीत, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार



व सामाजिक न्यायाचे आधारस्तंभ असून त्यांच्या पुतळ्याच्या परिसराकडे प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष ही गंभीर बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

सदर निवेदन देताना मोठ्या संख्येने बौद्ध बांधव उपस्थित होते. यामध्ये मनोज भगवानराव कांबळे, राहुल बबन चौदंते, सुभाष तुकाराम चौदंते, गौतम ग्यानु चौदंते, गंगाधर चांदबा जाधव, वाघमारे गंगाधर खुराजी, प्रियतम ग्यानोबा चौदंते, कोन्डोपंत राघोजी चौदंते, विनोद मारोती कांबळे, शिलवंत संभाजी डोंगरे, बाळकृष्ण पांडुरंग चौदंते, अविनाश विश्वनाथ चौदंते, स्वप्नील संजय चौदंते, अजय दिलीप कांबळे, शुभम दिलीप झगडे, साई गायकवाड, गौतम नारायण क्षीरसागर, संजय किशनराव चौदंते, नागराज गणेशराव चौदंते, संघर्ष संदीप चौदंते, सौरभ संजय चौदंते, दादाराव चौदंते, राजकुमार सर्जे, प्रेम चौदंते, राजरत्न क्षीरसागर, नामदेव चौदंते, हिरामण चौदंते, सुमेध सरोदे तसेच राजरत्न चौदंते आदी बौद्ध बांधवांचा समावेश होता.

नगरपरिषदेने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सुशोभीकरणासाठी निधी मंजूर करून लवकरात लवकर काम सुरू करावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## निफाड नगरपंचायतीतर्फे ई-वेस्ट संकलन व जनजागृती मोहिमेचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : निफाड शहरात ई-कचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी निफाड नगरपंचायतीच्या वतीने ई-वेस्ट जनजागृती व संकलन मोहिमेचा शुभारंभ नगरपंचायत कार्यालयात करण्यात आला.

निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मा. धिरज भामरे यांच्या हस्ते या मोहिमेचा प्रारंभ झाला.

ही मोहीम निफाड नगरपंचायत, वनप्रस्थ फाउंडेशन, सिन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पूर्णम इको



फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत नादुरुस्त व वापरात नसलेला इलेक्ट्रॉनिक कचरा योग्य पद्धतीने संकलित करून पर्यावरणपूरक रीतीने त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे.

ई-कचऱ्यामध्ये फ्रिज, वॉशिंग मशिन, फॅन, मायक्रोवेव्ह, टीव्ही, डीव्हीडी प्लेयर, होम थिएटर, संगणक, लॅपटॉप, पेन ड्राइव्ह, हेडफोन्स, प्रिंटर, डिजिटल व व्हिडिओ कॅमेरे, मोबाईल फोन, चार्जर आदी इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा समावेश होतो.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने निफाड शहरातील सर्व शाळांमधील शिक्षक-विद्यार्थी तसेच नागरिकांनी या ई-वेस्ट संकलन मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मा. मुख्याधिकारी धिरज भामरे यांनी केले. नागरिकांनी आपल्याकडे उपलब्ध असलेला ई-कचरा वनप्रस्थ फाउंडेशन व निफाड नगरपंचायत यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संकलन केंद्रांवर जमा करावा, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी नगरपंचायतीचे अधिकारी निलेश ठाकुर, शरद बोडके, राहुल लामखेडे, गौरव मोरे, मयुरी नवले तसेच कर्मचारी शरद काकुळते, नरेश धारराव, अनिल कुंदे, राजेंद्र भवर, रतन खालकर, दिनेश सोनवणे, विपुल सैंद्रे, प्रमोद शिंदे, कुणाल खाडे, दिपाली गिते आदी उपस्थित होते.

ही मोहीम यशस्वी होण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवावा,

असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिवपुरीत रुद्रोपासना महोत्सवाला दुसऱ्या दिवशीही उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**शिवपुरी, प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे** : महाशिवरात्री पर्वानिमित्त श्री क्षेत्र समिधा कोंडलिंगेश्वर देवस्थान मठ, शिवपुरी येथे सुरू असलेल्या रुद्रोपासना महोत्सवाला दुसऱ्या दिवशीही पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहाटेपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रुद्राभिषेक, पूजा-अर्चा व भगवान महादेवांचे दर्शन घेतले.

महोत्सवानिमित्त वेदमंत्रांच्या गजरात रुद्रपठण, महापूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले. मंदिर परिसर फुलांची सजावट व रोषणाईने



आकर्षक करण्यात आला असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. परिसरातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून महोत्सवात उत्साह व धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

# उरण महिला सामाजिक,शैक्षणीक व सांस्कृतिक संस्थेला 'उरण गौरव' सन्मान २० वर्षाच्या सेवा यज्ञाचा यथोचित गौरव

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** उरण महिला सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक संस्थेच्या शिरपेच्यात मानाचा तुरा !२० वर्षाच्या अविरत सेवेची "उरण गौरव" पुरस्काराने दखल.

गेल्या २ दशकांपासून उरण तालुक्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या' उरण महिला सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थेचा नुकताच 'उरण गौरव 'पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आमदार महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व महिला सक्षमीकरण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उरण महोत्सव २०२६ मध्ये संस्थेच्या सामाजिक कार्यातील मोलाच्या योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

सन २००६ मध्ये आदरणीय प्रधान मॅडम आणि विभावरी पाडगावकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेची बीजे रोवली गेली. आज २०२६ मध्ये ही संस्था २०व्या वर्षात पदार्पण करत असताना उरणच्या सामाजिक पटलावर स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. संस्थपिका संचालिका विद्यमान अध्यक्षा सौ गौरी देशपांडे, सचिव निशा शिरधनकर, कोषाध्यक्षा एड. वर्षा पाठारे आणि संपूर्ण कार्यकारणीच्या अथक परिश्रमातून हा डोलारा उभा आहे.



संस्थेने केवळ कागदावर काम न करता प्रत्यक्ष कृतीत उतरून अनेक उपक्रम राबवले आहेत .गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत ,नेत्रदान आणि आरोग्य शिबिरे तसेच पर्यावरण संरक्षणचे उपक्रम वर्षभर राबवले जातात .जागतिक महिला दिनानिमित्त उरण मधील विविध महिला मंडळांना एकत्र आणून एकतेची नवी परंपरा प्रस्थापित केली. मुलींना धैर्य, आणि जिद्द मिळावी यासाठी या संस्थेने सलग ३ वर्ष 'महिला दहीहंडी पथक 'यशस्वीरित्या चालवले, ज्यामुळे उरणच्या मुलींच्या साहसाला नवी संधी मिळाली. महिलांना आत्मनिर्भर बनवणे, त्यांच्यातील नेतृत्व कलागुणांना वाव देणे आणि व्यक्तिमत्व विकास करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट राहिले आहे.

यापूर्वीही या संस्थेच्या कार्याची दखल घेऊन द्रोणागिरी भूषण, लायन्स इंटरनॅशनल क्लब ,स्टेप आर्ट्स अकॅडमी, आणि शिवशाही प्रतिष्ठान यासारख्या नामांकित संस्थाने त्यांना सन्मानित केले आहे. आता मिळालेल्या 'उरण गौरव' पुरस्कारामुळे संस्थेच्या शिरोपेचात आणखीन एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

२००६साली लावलेल्या छोट्याशा रोपटयाचे आज वटवृक्ष झाले आहे हे पाहताना अभिमान वाटत आहे तेव्हाचे हे पेरलेले विश्वासाचे बीज आज उरणमधील हजारो महिलांसाठी 'आधारवड 'बनला आहे. २० वर्षाच्या प्रवासात पुरस्कारांपेक्षा अनेक गरजू महिलांच्या चेहऱ्यावरचे हसू आणि लेकीबाळींच्या डोळ्यातील जिद्द या संस्थेने कमावली आहे. वृद्धाश्रमातील थकलेला डोळ्यांना दिलेलं मायेचे पांघरून, दहीहंडीच्या थरावर चढणाऱ्या धाडसी मुलींच्या हाताला दिलेला आधार , म्हणूनच संस्थेने संस्था म्हणून काम नाही केलं तर कुटुंब म्हणून मायेची उब दिली. 'उरण गौरव'सन्मान मिळाल्याबद्दल अध्यक्षा गौरी देशपांडे यांनी उरण महोत्सवाच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे संस्थेच्या वतीने आभार मांनले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे ,सचिव निशा शिरधनकर ,कल्याणी दुखंडे, दीपा शिंदे, दिपा मुकादम, प्रगती दळी गौरी मंत्री, जोष्ना येरुणकर, सीमा घरत आदि पदाधिकारी उपस्थित होत्या. शेवटी पुरस्कार येतात आणि जातात पण काळजाला भिडणारे कार्यच समाजाच्या स्मरणात जिवंत राहतं. उरणच्या 'दुर्गांनी' सिद्ध केले की जेव्हा महिला एकत्र येतात तेव्हा केवळ घर नाही तर संपूर्ण समाज घडवतात या २०व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या सर्व माऊलींना शुभेच्छा.

## चिखलवर्धा कुर्ली रोड वर ट्रकच्या धडकेत सायफळ येथील दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा ते कुर्ली रोडवर आज एक हृदयद्रावक अपघात घडला. एका भरधाव ट्रकने दुचाकीला जोरात धडक दिली, ज्यामध्ये सायफळ येथील रमेश चिल्लावार यांचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, अपघात केल्यावर ट्रक चालक मदतीसाठी न थांबता ट्रकसह घटनास्थळावरून पळून गेला आहे.

चिखलवर्धा ते कुर्ली हा रस्ता अरुंद (सिंगल रोड) आहे. या मार्गावरून सध्या मोठ्या ट्रकची ये-जा वाढली आहे. आज रमेश चिल्लावार आपल्या दुचाकीने जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच अंत झाला.

**ट्रक चालकांचा वाढता धुमाकूळ:**

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावर ट्रक चालक अतिशय वेगाने गाड्या चालवतात. रस्ता लहान असूनही ट्रकच्या वेगावर कोणाचेही नियंत्रण नाही. आजच्या या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, फरार ट्रक चालकाचा शोध घेऊन त्याच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

## धर्माबाद नगरपरिषदेत पहिल्याच सभेत विकासकामांना गती; 'नमो उद्यान' व सीसीटीव्ही योजनेला मंजुरी

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/ गिरमाजी सुर्यकार** : दिनांक १० फेब्रुवारी २०२६ (मंगळवार) रोजी धर्माबाद नगरपरिषद येथे सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या नियमित कामकाजास सुरुवात करण्यात आली.आजच्या सभेत शहराच्या विकासाशी निगडित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले :धर्माबाद नगरपरिषद क्षेत्रातील महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा ठराव मंजूर.गुंठेवारी २०२१ अंतर्गत प्रस्ताव दाखल करण्यासाठी नागरिकांना मुदतवाढ देण्याचा निर्णय.शहरात 'नमो उद्यान' उभारण्यासाठी प्रशासकीय मंजुरी.नगरपरिषद सेवाशुल्क संदर्भात प्राप्त प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत ठराव. नगरपरिषद हद्दीतील व्यापारी संकुलांचे लिलाव करण्याबाबत निर्णय.शहराच्या हद्दवाढ प्रस्तावावर सखोल चर्चा करून पुढील कार्यवाही निश्चित.धर्माबाद येथील रेल्वेच्या प्रलंबित मागण्यांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय.तसेच, सभागृहात मा. अजित दादा पवार यांच्या कुटुंबीयांना शोकप्रस्ताव पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

यावेळी शहरातील CISF मध्ये निवड झालेल्या रवी सायली कन्कापुरे व लोकेश पलिकोंडावार यांचा नगरपरिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झालेल्या ईश्वरी श्रीनिवास मल्लपिल्लू हिचा सभागृहातर्फे विशेष गौरव करण्यात आला.सदर सभेचे अध्यक्षस्थान मा. अध्यक्ष संगीता महेश (शंकर) बोलमवार यांनी भूषविले. यावेळी मा. उपाध्यक्ष महेश (शंकर) बोलमवार, मा. मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, विविध सभापती, नगरसेवक/नगरसेविका तसेच नगरपरिषदेचे अधिकारी उपस्थित होते.

## सरपंच सौ.मेघाताई पवन करेवाड यांच्या यशस्वी कार्यपूर्ती निमित्त सिरंजणीत कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ हिमायतनगर:-** तालुक्यातील सिरंजनी येथील संत रोहिदास चौकात सरपंच सौ. मेघाताई पवन करेवाड यांच्या यशस्वी कार्यकाळाच्या पूर्तीनिमित्त कृतज्ञता व गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, युवक मंडळी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यकाळात ग्रामविकास, पारदर्शक प्रशासन, सर्वसामान्य जनतेशी थेट संवाद, तसेच सेवा भावनेतून राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांमुळे सरपंच मेघाताई करेवाड यांनी ग्रामस्थांचा विश्वास संपादन केला असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून नमूद केले. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, सामाजिक उपक्रम व महिला सक्षमीकरणाच्या कामांचा आवर्जून उल्लेख करण्यात आला.

या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरपंचांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. याबरोबरच इतर ग्रामपंचायत सदस्यांचा कार्यपूर्ती निमित्त ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना सरपंच प्रतिनिधी पवन करेवाड यांनी "हा सन्मान आमचा वैयक्तिक नसून संपूर्ण गावाच्या सहकार्याचा आहे. पुढील काळातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्याचा प्रयत्न राहील. कार्यकाळ जरी संपला असेल तरी कार्य शेवटच्या श्वासापर्यंत चालू राहील !" असे भावनिक मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आडेलू भाटे सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. तर आयोजक समस्त गावकरी सिरंजनी यांच्या वतीने आभार मानण्यात आले. कार्यक्रमानंतर पवन करेवाड मित्र मंडळाकडून ग्रामस्थांसाठी अल्पोपहार स्वरूपात ग्राम भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कृतज्ञता सोहळा उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला..

## तळा तालुक्यात जि.प.व पं.स.निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दणदणीत विजय

**दैनिक युवक आधार**

**नितीन लोखंडे तळा प्रतिनिधी** : तळा - तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून तळा तालुक्यातील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मतदान करून तालुक्यामध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व कायम राखलेले आहे. तळा तालुका हाच राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. हे मतदारांनी दाखवून दिलेले आहे. राष्ट्रवादीच्या सर्वच उमेदवारांनी अधिक मताधिक्य घेऊन विरोधी उमेदवारांना निवडणुकीमध्ये पराभूत केले आहे. तालुक्यातील विजयी आणि पराभूत उमेदवारांचा तपशील पुढीलप्रमाणे - चरई खुर्द गट जि.प.उमेदवार सौ.गिता उत्तम जाधव पक्ष ( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - विजयी मते ६७८३ ) विरुद्ध सौ.अस्मिता गुणाजी शिगवण ( पक्ष शिवसेना पराभूत



मते - १५२९ ) सौ.करूणा कमलेश पातेरे ( पक्ष शेकाप पराभुत - मते २२९ ) नोटा-९१, रहाटाड जिल्हा परिषद गट उमेदवार सौ. नलिनी नरेंद्र लोखंडे पक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विजयी मते - ५०९८ ) विरुद्ध सौ.रोहीणी रमेश पिंपळे ( शिवसेना पराभूत - मते २७७० ) नोटा-१७८,

तळा पंचायत समिती बोरघर हवेली गट उमेदवार श्री. रवींद्र गणपत मांडवकर पक्ष ( राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी विजयी मते- ३६२५ ) विरुद्ध श्री. अनंत वामन खराडे पक्ष ( शिवसेना पराभूत - मते ३८१ ) श्री. संतोष नामदेव आमले ( अपक्ष पराभूत मते- ४६६ ) नोटा - ४६, पंचायत समिती चरई खुर्द गट उमेदवार सौ. अक्षरा सचिन कदम पक्ष ( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विजयी - मते २७८७ ) विरुद्ध सौ.काप सुलभा संतोष पक्ष ( शिवसेना पराभूत - मते १२१४ ) नोटा-११३, रहाटाड पंचायत समिती गट उमेदवार श्री. नथुराम भिवा मुकण पक्ष ( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विजयी - मते २२७७ ) विरुद्ध श्री. चंद्रकांत विठ्ठल मुकंद पक्ष ( शिवसेना पराभूत मते - १३८८ ) नोटा- ११७, मांदाड पंचायत समिती गट उमेदवार सौ. रूपाली जगन्नाथ तांडेल पक्ष ( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विजयी - मते २९९३ ) विरुद्ध सौ. रोशनी रमेश तांदलेकर ( शिवसेना पराभूत - मते ११८२) नोटा -८९.

## विद्यार्थी सुरक्षेसाठी वालचंदनगर पोलीस स्टेशनतर्फे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सुरक्षिततेसाठी वालचंदनगर पोलीस स्टेशनतर्फे आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक श्री.रतिलाल चौधर यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात सुरक्षित कसे राहावे याबाबत सविस्तर व उपयुक्त मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी व संभाव्य धोके ओळखून त्यावर योग्य वेळी उपाययोजना करता यावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.मार्गदर्शन करताना श्री.चौधर यांनी रस्ते सुरक्षेचे नियम पाळण्याचे महत्त्व अधोरेखित करत हेल्मेटचा वापर, वाहतूक चिन्हांचे पालन, तसेच घाई-गडबडीत रस्ता ओलांडू नये यासारख्या मूलभूत बाबींवर भर दिला.अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना सावधगिरी बाळगावी, कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पालक, शिक्षक किंवा पोलिसांना कळवावे, असे त्यांनी सांगितले.

सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देताना त्यांनी मोबाईल व इंटरनेटचा वापर करताना येणारे धोके स्पष्ट केले. सोशल मीडियावरील फसवणूक, बनावट प्रोफाइल, चुकीची माहिती, अनोळखी लिंक यांपासून दूर राहण्याचा सल्ला देत वैयक्तिक माहिती कुणालाही शेअर करू नये, असे आवाहन केले. तसेच ऑनलाइन गेम्स, फसवे कॉल व OTP फसवणूक याबाबतही विद्यार्थ्यांना सतर्क राहण्यास सांगितले.शाळा-महाविद्यालयात ये-जा करताना



सुरक्षित मार्गांचा अवलंब करावा,आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यासाठी डायल 112 सारख्या हेल्पलाइन क्रमांकांचा योग्य वापर करावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष सूचना देत आत्मविश्वासाने वागावे कोणतीही अडचण किंवा छेडछाड झाल्यास न घाबरता तक्रार करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना श्री.चौधर यांनी समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. अशा प्रकारचे मार्गदर्शन कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढविण्यास आणि सुरक्षिततेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यास उपयुक्त ठरतात, असे मत विद्यालयाचे प्राचार्य श्री.गणेश घोरपडे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूराव कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवाजी मोरे यांनी मानले. यावेळी पोलीस हवालदार सचिन गायकवाड, अरविंद गडदे,अभिमन्यू चव्हाण,विशाल तुपे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरक्षणासाठी रक्ताची वंशावळ बदलणारी चळवळ

### मराठा—ओबीसी संघर्षाची अस्वस्थ करणारी गाथा

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक** : भारतीय समाजव्यवस्थेचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, आरक्षण ही दया नाही तर सामाजिक अन्यायाविरुद्धची घटनात्मक भरपाई आहे. पण आज महाराष्ट्रात जे घडत आहे, ते केवळ आरक्षणाच्या मागणीपुरते मर्यादित नसून सत्य, इतिहास आणि सामाजिक न्याय यांच्यावर केलेला घाला आहे.

आज एक विचित्र, धोकादायक आणि आत्मविरोधी प्रक्रिया सुरू आहे मराठा म्हणून जन्माला आलेले लोक, आरक्षणासाठी आपली मराठा वंशावळ नाकारून 'कुणबी' असल्याचा दावा करीत आहेत.

हा केवळ कागदोपत्री बदल नाही; हा इतिहासाशी, समाजशास्त्राशी आणि स्वतःच्या अस्मितेशी केलेला विश्वासघात आहे. इतिहास स्पष्ट सांगतो मराठा समाज हा परंपरेने सत्ताधारी, जमीनदार, लष्करी व प्रशासकीय व्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिला आहे. पेशवाई, सरदारकी, जहागिरी, इनामदारी या सर्व रचना मराठा वर्चस्वाच्या साक्षीदार आहेत.

याउलट ओबीसी समाज कुणबी, माळी, तेली, सुतार, लोहार, कुंभार, धनगर इ. हा पिढ्यान्पिढ्या श्रम, शोषण आणि सामाजिक दुय्यमतेचा बळी ठरलेला आहे.मग प्रश्न असा आहे इतिहासाने सत्ताधारी ठरवलेला समाज आज 'मागास' कसा ठरू शकतो?जो समाज कधीच सामाजिक बहिष्काराचा बळी ठरलेला नाही, तो आरक्षणाचा नैतिक हक्क कसा सांगू शकतो? कुणबी हा शब्द केवळ जात नाही, ती एक श्रमसंस्कृती, शेतीवर अवलंबून असलेली आणि सामाजिकदृष्ट्या वंचित जमात आहे. आज जेव्हा मराठा समाजातील काही घटक कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी धडपड करतात, तेव्हा ते ओबीसींच्या हक्कावर गदा आणतात. सामाजिक न्यायाच्या तत्त्वालाच तडा देतात

आणि आरक्षण व्यवस्थेला फसवणुकीचे साधन बनवतात

आरक्षण हे गरिबी निवारणाचे यंत्र नाही, ते ऐतिहासिक सामाजिक बहिष्काराची भरपाई आहे हे सत्य जाणूनबुजून दुर्लक्षित केले जात आहे.

मराठा विरुद्ध ओबीसी हा संघर्ष नाही, तर सत्य विरुद्ध सत्ता आहे. हे लक्षात घ्यायला हवे की,हा संघर्ष सामान्य मराठा विरुद्ध सामान्य ओबीसी यांच्यात नाही.हा संघर्ष आहे राजकीय सोयीसाठी इतिहास वाकवणाऱ्यांविरुद्ध मतांच्या राजकारणासाठी समाजात फूट पाडणाऱ्यांविरुद्ध,घटनात्मक मूल्यांची हत्या करणाऱ्या मानसिकतेविरुद्ध आज जर मराठ्यांना ओबीसी आरक्षणात घुसवले गेले, तर उद्या ओबीसींच्या नोकऱ्या कमी होतील,शिक्षणातील संधी आक्रसतील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक न्यायाचा पाया कोसळेल.

मराठा जातीस १०० वर्षे आरक्षण बंद असावे ही मागणी द्वेषातून नाही, तर तत्त्वातून आहे. समाज ऐतिहासिकदृष्ट्या वर्चस्वशाली राहिला.ज्याच्या हातात सत्ता, जमीन, शिक्षणाची साधने राहिली. ज्याला कधी अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, गावबंदी भोगावी लागली नाही त्या समाजाला आरक्षण देणे म्हणजे सामाजिक अन्यायाला वैधता देणे आहे म्हणूनच, मराठा जातीला पुढील १०० वर्षे कोणतेही आरक्षण दिले जाऊ नये त्याऐवजी शिक्षण, रोजगारनिर्मिती, आर्थिक सुधारणा या सर्वसामान्य उपाययोजना लागू कराव्यात. ही सत्याची बाजू घेण्याची वेळ आहे. आज प्रश्न आरक्षणाचा नाही तर प्रश्न आहे सत्याचा, इतिहासाचा आणि संविधानाचा. जर आपण आज गप्प बसलो,तर उद्या आरक्षणाचा अर्थच उरणार नाही.ओबीसी समाजाने, पुरोगामी मराठ्यांनी आणि सर्व न्यायप्रिय नागरिकांनी एकत्र येऊन सांगितले पाहिजे. आरक्षण फसवणुकीसाठी नाही इतिहास बदलण्यासाठी नाहीतर शोषितांच्या उत्थानासाठी आहेसत्य अस्वस्थ करते, पण तेच मुक्त करते.

# उरण महोत्सवात 'जनसागराचा महापूर '!
## लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनी लुटला कलेचा आनंद

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** उरण मध्ये संस्कृतीचा जागर वरून महोत्सव २०२६ उत्साहात संपन्न! आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरणाचा भव्य सोहळा!

उरण मधील कला, संस्कृती आणि महिलांच्या कर्तुत्वाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा 'उरण महोत्सव २०२६' मोठ्या धुमधडाक्यात पार पडला .आमदार महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व महिला सक्षमीकरण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सात आणि आठ फेब्रुवारी एन आय हायस्कूल उरणच्या मैदानावर आयोजित या महोत्सवाने उरणकरांच्या डोळ्याचे पारणे फिटले.

दोन दिवसीय महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे उरणकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद महोत्सव पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी नृत्य, गायन आणि कला प्रेमींनी दोन्ही दिवस लक्षणीय गर्दी केली होती. केवळ तरुणच नाही तर लहान मुलापासून ते आबालवृद्धांतपर्यंत सर्वजण




सोहळ्यात तल्लीन झाले होते. उरणच्या प्रत्येक गल्लीतून आलेल्या नागरिकांनी या महोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला

खाद्यपदार्थ हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या स्टॉल्स वर ग्राहकांची झुंबर उडाली होती. मनोरंजनात्मक कार्यक्रमात लावणी, ऐतिहासिक नाट्यप्रयोग, सोलो डान्स ,ग्रुप डान्स आणि गायन अशा विविध कलांचे सादरीकरण बबन पाटील आणि अतिश पाटील यांच्या सूत्रसंचालनाने अधिकच रंगतदार झाले.

या महोत्साचे आणखीन एक मुख्य आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्तींचा करण्यात आलेला गौरव"उरण गौरव' पुरस्कारासह अनेक मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यसम्राट आमदार महेश बालदी व सौ नीता महेश बालदी व त्यांच्या कार्यकारिणी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा यशस्वी झाला. महोत्सवाच्या नियोजनात संपूर्णा थळी, रजनी कोळी, जानवी पंडित ,पूनम पाटेकर, सानिका कदम, हेमा घरत यांच्यासह अस्तित्व संस्थेच्या सर्व सभासदांनी अहोरात्र परिश्रम घेतले. यावेळी आयोजित लकी ड्रॉ मधील आकर्षक बक्षीसांनी महोत्सवाची रंगत वाढवली.

उरण च्या मातीतील कला आणि महिलांच्या जिद्दीचा हा आविष्कार खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला.आबालवृध्दांच्या चेहऱ्यावरचे हसू आणि कलाकारांना मिळालेली दाद हेच या महोत्सवाचे खरे यश आहे.

आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा सोहळा उरणकरांच्या आठवणीत कायमचा सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल.

# राज्यभर अवजड वाहनांवर धडक तपासणी मोहीम राबवा – मंत्री प्रताप सरनाईकांचे कडक निर्देश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळ घडलेल्या भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील अवजड वाहनांवर व्यापक आणि पारदर्शक तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मोटार परिवहन व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत सूचित केले.अपघात रोखायचे असतील तर नियमांची केवळ अंमलबजावणी नव्हे, तर जागरूकतेची चळवळ उभी राहिली पाहिजे.

३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अपघातामुळे तब्बल ३२ तास महामार्ग वाहतुकीसाठी विस्कळीत झाला. प्रवाशांचे, विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे मोठे हाल झाले. प्राथमिक पाहणीत चालकाच्या बेपर्वाईमुळे, वेगाने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात घडल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर भाष्य करताना मंत्री सरनाईक म्हणाले, "चालकांच्या वाहन चालवण्याच्या




पद्धतीवर नियंत्रण आणि प्रबोधन हीच अपघातमुक्त महामार्गाची गुरुकिल्ली आहे."

**वाहनांच्या तांत्रिक तपासणीला वेग, पारदर्शकतेवर भर**

राज्यातील सर्व अवजड वाहनांची तांत्रिक तपासणी काटेकोर आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, असे निर्देश देण्यात आले. विशेषतः फॉर्म 138/A अंतर्गत दिल्या जाणाऱ्या वाहन योग्यता प्रमाणपत्र प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यावर भर देण्यात आला. काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांतून प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

**'ब्लॅक स्पॉट'वर विशेष लक्ष**

महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट्स) माहिती चालकांपर्यंत पोहोचवणे, त्या भागात प्रवेश करण्यापूर्वी समुपदेशन व सूचना देणे, तसेच पोलीस व परिवहन विभागाने संयुक्तरीत्या जनजागृती मोहीम राबवणे—या उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे आदेश देण्यात आले.

**अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सविस्तर अहवाल**

महामार्ग अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचा सविस्तर अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सादर करण्याचे निर्देशही मंत्री सरनाईक यांनी संबंधित विभागांना दिले.अपघाताची वेदना अजून ताजी असताना शासनाने घेतलेली ही धडक भूमिका म्हणजे केवळ प्रशासकीय हालचाल नाही, तर प्रत्येक प्रवाशाच्या सुरक्षिततेसाठी उचललेले ठोस पाऊल आहे. नियम, नियंत्रण आणि जागरूकता या त्रिसूत्रीवरच सुरक्षित प्रवासाचा पाया उभा राहणार, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

# कोकणात 'सुरक्षित तट – समृद्ध भारत' मोहिमेला बळ

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** कोकण किनारपट्टीच्या सुरक्षिततेसाठी केंद्र शासनाच्या "सुरक्षित तट – समृद्ध भारत" या मोहिमेअंतर्गत आयोजित वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ चे शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठामध्ये आगमन होणार आहे. या उपक्रमामुळे कोकणात राष्ट्रभक्ती, सुरक्षा जनजागृती आणि नागरिक सहभागाला नवे बळ मिळणार आहे. ही सायक्लोथॉन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथे सकाळी ठीक ९:०० वा (ध्वजप्रदर्शन/फ्लॅग ऑफ समारंभ) होणार असून ही रॅली – महाड – सोवेली गाव (दापोली) – दाभोळ – गुहागर असा प्रवास करणार आहे.

लोणेरे येथे आयोजित ध्वजप्रदर्शन समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सायक्लोथॉनला अधिकृत प्रारंभ करण्यात येणार आहे.

या सायक्लोथॉनमध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, युवक-विद्यार्थी, महिला बचत गट तसेच मच्छीमार संघटनांचा सक्रिय सहभाग असणार आहे. "वंदे मातरम्" व "सुरक्षित तट – समृद्ध भारत" या घोषणांतून किनारपट्टी सुरक्षेचा संदेश जनतेपर्यंत






पोहोचविण्यात येणार आहे.

या प्रसंगी नागरिकांना किनारपट्टीवरील सतर्कता, संशयास्पद हालचालींची त्वरित माहिती देण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन पाळत, सीसीटीव्ही व्यवस्था तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आल्याची माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली.

या मोहिमेमुळे कोकणातील सुरक्षा अधिक मजबूत होण्यासोबतच पर्यटन, उद्योग आणि स्थानिक रोजगाराच्या संधींना चालना मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# बॅरिस्टर अंतुले साहेबांच्या मानवतावादी विचारांना नाईक - अंतुले महाविद्यालयात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ :** समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी मिळावी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख मिळावेत आणि राजकारणातूनही माणुसकी जपली जावी, या मूल्यांची शिकवण देणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री स्व. बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय, म्हसळा येथे सामाजिक जाणिवा जागवणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सकस खाद्य महोत्सव आणि गरजू नागरिकांना जीवनावश्यक अन्नधान्य वाटप या उपक्रमांमुळे जयंती सोहळ्याला भावनिक आणि प्रेरणादायी स्वरूप लाभले.

कोकण उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कोकण उन्नती मित्र मंडळाचे सचिव अशोक तळवटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला मंडळाच्या खजिनदार वंदना विचारे, महाविद्यालयीन विकास समितीचे प्रतिनिधी फझल हळदे,




समिती सदस्या निलम वेटकोळी, डॉ. मुश्ताक मुकादम, ज्येष्ठ पत्रकार उदय कळस, समाजसेवक निजाम कागदी, नफिस शहापुरी,इस्माईल दोंदिलकर,सुहेल कोठीवले, महम्मद पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अंतुले साहेबांच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थितांमध्ये एक वेगळीच भावनिक ऊर्मी जाणवत होती.

अध्यक्षीय भाषणात अशोक तळवटकर यांनी अंतुले साहेबांच्या कार्याची आठवण करून देताना सांगितले की, "डोंगराळ आणि दुर्गम भागातून पुढे आलेल्या एका सामान्य व्यक्तीने देशाच्या राजकारणात आपला ठसा उमटवणे ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नसून ग्रामीण समाजाच्या जिद्दीचे प्रतीक आहे." ठाम निर्णयक्षमता, स्पष्ट विचारसरणी आणि जनतेशी असलेले जिव्हाळ्याचे नाते ही त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद होती, असे ते म्हणाले. मुरुड व म्हसळा सारख्या भागात महाविद्यालये उभारून त्यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली, ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष असल्याचे त्यांनी नमूद केले. "गरीबी आणि संघर्षातून उभा राहिलेला नेता म्हणून त्यांनी मानवतेची सेवा केली; जातीभेदाला कधीही थारा दिला नाही," असे भावनिक शब्दांत त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील उर्दू विभागाच्या प्राध्यापिका समिना नफिस शहापुरी यांना कौमी उर्दू शिक्षक संघ यांच्यावतीने प्राप्त झालेल्या उर्दू रत्न पुरस्कारा बाबत त्यांचा सत्कार करण्यात आला

जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'फूड फेस्टिव्हल'मध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल उभारून आपल्या कौशल्याचा प्रत्यय दिला. अशोक तळवटकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. ज्येष्ठ पत्रकार उदय कळस, समाजसेवक नफिस शहापुरी आणि निजाम कागदी यांनी परीक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे परीक्षण केले. विद्यार्थ्यांच्या उत्साहाने आणि सृजनशीलतेने महाविद्यालय परिसरात आनंददायी वातावरण निर्माण झाले होते.

जयंतीनिमित्त, कोकण उन्नती मित्र मंडळाच्या खजिनदार वंदना विचारे यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील सुमारे १०० गरजू नागरिकांना जीवनावश्यक अन्नधान्य व वस्तूंचे वाटप करण्यात आले. अंतुले साहेबांच्या मानवतावादी विचारांचा प्रत्यय देणारा हा उपक्रम लाभार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरला. लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान आणि कृतज्ञतेचे भाव कार्यक्रमाचे खरे यश अधोरेखित करत होते. स्व. बॅ. ए. आर. अंतुले यांच्या कार्याची प्रेरणा आणि मानवतेचा संदेश देणारा हा जयंती सोहळा म्हसळा तालुक्यातील नागरिकांसाठी केवळ स्मरणाचा नव्हे तर समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा ठरला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाच्या सामाजिक बांधिलकीची परंपरा अधोरेखित करत विद्यार्थ्यांना समाजाभिमुख उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संजय बेंद्रे आणि प्रा. कानिफ भोसले यांनी केले.

# मुरुडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला ठोस पाठिंबा

## जिल्हा परिषद व पंचायत समितीत प्रभावी यश

**दैनिक युवक आधार**

**लातूर प्रतिनिधी / मोहम्मद पिंजारी** : मुरूड मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार गट) उल्लेखनीय कामगिरी नोंदवत स्थानिक राजकारणात आपली मजबूत पकड सिद्ध केली आहे. अनेक वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी स्पष्ट कौल देत पक्षाला मोठ्या प्रमाणात समर्थन दिल्याचे निकालांवरून स्पष्ट झाले आहे.

मुरुड जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या जयश्री लक्ष्मीकांत तवले यांनी काँग्रेसच्या उमेदवार सारिका निलेश फेरे यांच्यावर २०१९ मतांची भक्कम आघाडी घेत विजय संपादन केला. या विजयामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाजूने झुकल्याचे चित्र दिसून आले आहे.



पंचायत समितीच्या निवडणुकीतही पक्षाने आपली आघाडी कायम ठेवली. मुरुड गणात अंशकीत (पंकज) राजेंद्र गायकवाड यांनी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार उद्धव चव्हाण यांना १३३० मतांनी पराभूत केले. तर पंचायत समिती गण क्रमांक ७६ मध्ये सुचिता सतीश अंधारे यांनी काँग्रेसच्या वैष्णवी संजय अंधारे यांच्याविरुद्ध झालेल्या चुरशीच्या लढतीत ११५ मतांच्या फरकाने विजय मिळवला.

निकाल जाहीर होताच मुरुड शहर आणि परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी, अभिनंदनाचे कार्यक्रम आणि विजय सोहळ्यांमुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

दरम्यान, या निकालामागील कारणांबाबत विविध राजकीय चर्चा सुरू आहेत. अजितदादांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या भावनिक वातावरणाचा मतदानावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे. काहींच्या मते सहानुभूतीच्या लाटेचा फायदा पक्षाला झाला असावा.याशिवाय, भारतीय जनता पक्षातील काही ज्येष्ठ स्थानिक नेत्यांना पक्षश्रेष्ठींकडून अपेक्षित स्थान न मिळाल्याने संघटनात्मक पातळीवर नाराजी निर्माण झाली आणि त्याचा परिणाम निकालांवर झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दुसरीकडे, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून स्थानिक उमेदवारांना पुरेसा पाठिंबा मिळाला नाही, अशीही चर्चा मतदारांमध्ये रंगत आहे.

तसेच तवले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोडून अजित पवार गटात प्रवेश केल्याचा काही प्रमाणात सकारात्मक परिणाम झाल्याचेही सांगितले जात आहे. बदलत्या राजकीय समीकरणांचा आणि स्थानिक स्तरावरील संघटनात्मक रणनीतीचा या निकालावर प्रभाव पडल्याचे जाणकारांचे मत आहे.मात्र या सर्व चर्चांवर संबंधित पक्षांकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही.

# उरणमध्ये भाजपचा धुव्वा; महाविकास आघाडीचा सत्ताकब्जा

## १२ पैकी १० जागांवर वर्चस्व, मतदारांचा भाजपला जोरदार दणका

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड** : उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपचा अक्षरशः धुव्वा उडवत सत्तेवर निर्विवाद कब्जा केला आहे. मतदारांनी भाजपला संपूर्णपणे नाकारत उरणमध्ये महाविकास आघाडीच एकमेव निर्णायक शक्ती असल्याचा ठाम कौल दिला आहे.

४ जिल्हा परिषद व ८ पंचायत समिती सदस्य पदांच्या निवडणुकीत एकूण १२ पैकी १० जागा महाविकास आघाडीने पटकावत भाजपला कोपऱ्यात ढकलले आहे. भाजपला केवळ १ जिल्हा परिषद व १ पंचायत समिती जागेवर समाधान मानावे लागले, हा निकाल भाजपसाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शेतकरी कामगार पक्ष आणि मनसे या घटक पक्षांनी एकजुटीने लढा देत, काटेकोर नियोजन आणि आक्रमक प्रचाराच्या जोरावर भाजपच्या फाजील आत्मविश्वासाला मतपेटीतून चोख उत्तर दिले.



विजयी सदस्यांची यादी

जिल्हा परिषद :

महाविकास आघाडीचे निवडून आलेले सदस्य - ॲड.अविनाश विजय ठाकूर – चिरनेर, प्रेरणा कुणाल पाटील – नवघर, डॉ. मनिष पाटील – जासई, आणि फक्त एक जागा भाजपाची- रीना जितेंद्र घरत – चाणजे

पंचायत समिती : महाविकास आघाडीचे निवडून आलेले सदस्य -

परेश धनाजी ठाकूर – नवघर,

दिपक सुरेश भोईर – भेंडखळ,निर्मला नरेश घरत -जासई, प्रियांका दिपक मढवी – चिर्ले,महेश महादेव म्हात्रे – केगाव,

कविता रूपेश पाटील – चिरनेर

प्रारंभी अविनाश गावंड – आवरे - महाविकास आघाडी, आणि फक्त भाजपाचा एक उमेदवार पंचायत समितीला-कैलास मोरेश्वर भोईर – चाणजे

या निकालामुळे भाजपचे सर्व अंदाज कोसळले असून, आमदारकीच्या निवडणुकीत मिळालेल्या मतांचे गणित जिल्हा परिषद व पंचायत समितीत पूर्णपणे फसल्याचे स्पष्ट झाले आहे. उरणमध्ये भाजपला आत्मचिंतन नव्हे तर आत्मपरीक्षण करावे लागणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

विजयानंतर उरण शहर व ग्रामीण भागात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत "उरण आमचाच"चा नारा दिला, तर या निकालाने २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची दिशा स्पष्ट झाली असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# सिल्लोडचा गड विभागला!; जिल्हा परिषदेत सत्तारांचे वर्चस्व, पंचायत समितीवर भाजपचा झेंडा

## दहा वर्षांनंतर सत्तारांच्या बालेकिल्ल्यात भाजपची 'एन्ट्री'

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** सिल्लोड तालुका जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालात धक्कादायक चित्र पाहावयास मिळाले. शनिवारी झालेल्या मतदानात ग्रामीण मतदारांनी धक्कातंत्राचा अवलंब केल्याने निवडणुकीच्या जाणकारांना अचंबित करून टाकले आहे. सोमवारी झालेल्या मतमोजणीत जिल्हा परिषदेच्या ९ गटांपैकी शिवसेना शिंदे गटाने ६, तर भारतीय जनता पक्षाने ३ जागी यश मिळवले. मात्र, पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १० जागी, तर शिवसेना शिंदे गटाने ८ जागी विजय मिळवून सत्तांतर घडवले आहे. या निकालामुळे गेल्या १० वर्षांपासून सत्तेबाहेर असलेल्या भाजपला आता पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची संधी मिळणार आहे.

सोमवारी शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (ITI) सभागृहात सकाळी १० वाजेपासून मतमोजणीला प्रारंभ झाला. सुरुवातीला अजिंठा, शिवना, अंभई, घाटनांद्रा, भराडी, अंधारी, केऱ्हाळा, उंडणगाव अशा गट आणि




गणांची मतमोजणी घेण्यात आली.

**निवडणुकीचा सविस्तर निकाल खालीलप्रमाणे:**

१) अजिंठा गट व गण:

अजिंठा गटात शिवसेनेच्या आयशा बेगम सय्यद नासेर हुसेन (१२,९४८ मते) यांनी ५,७८२ मतांनी विजय मिळवला. अजिंठा गणात शिवसेनेच्या रजिना बेगम अब्दुल समद (८,३७० मते) विजयी झाल्या, तर हळदा गणात भाजपच्या अनुराधा गणेश गवळे (५,०५६ मते) यांनी १७६ मतांनी बाजी मारली.

२) शिवना गट व गण:

शिवना गटात शिवसेनेच्या निकिता राजेंद्र काळे (१२,०२५ मते) १,२०५ मतांनी विजयी झाल्या. शिवना गणात शिवसेनेचे शेख सलिम भिकन (५,०४५ मते) विजयी झाले, तर पानवडोद बु. गणात भाजपच्या नेहा सुमित खरात (६,०४० मते) १,६२० मतांनी विजयी झाल्या.

३) उंडणगाव गट व गण:

उंडणगाव गटात भाजपचे डॉ. सचिन वाघ (१२,२५४ मते) यांनी ५,३१७ मतांनी विजय मिळवला. उंडणगाव गणात भाजपच्या अनिता सुरेश बनकर (५,९८३ मते) आणि हट्टी गणात भाजपचे गजानन सांडू जाधव (५,४३१ मते) विजयी झाले.

४) अंभई गट व गण:

अंभई गटात शिवसेनेचे अब्दुल आमेर अब्दुल सत्तार (१२,७४६ मते) ३,४३५ मतांनी विजयी झाले. अंभई गणात शिवसेनेच्या रजनी नगरे विजयी झाल्या, तर केळगाव गणात भाजपच्या तुळसा कोठाळे यांनी १,४७७ मतांनी विजय मिळवला.

५) घाटनांद्रा गट व गण:

घाटनांद्रा गटात शिवसेनेच्या आशा अर्जुन गाढे (९,४७६ मते) विजयी झाल्या. घाटनांद्रा गणात शिवसेनेच्या सोफियाबी इब्राहिम शेख आणि आमठाणा गणात शिवसेनेचे रघुनाथ मोरे विजयी झाले.

६) डोंगरगाव गट व गण:

डोंगरगाव गटात शिवसेनेचे देविदास पालोदकर (१०,९५५ मते) २,२२६ मतांनी विजयी झाले. डोंगरगाव गणात शिवसेनेचे निजामखा पठाण विजयी झाले, तर पालोद गणात भाजपच्या तेजस्विनी इंगळे (जगताप) ६८९ मतांनी विजयी झाल्या.

७) भराडी गट व गण:

भराडी गटात भाजपचे राधाकृष्ण काकडे (१२,९९२ मते) ३,५२८ मतांनी विजयी झाले. भराडी गणात भाजपचे नारायण खोमणे यांनी केवळ ३४ मतांनी अटीतटीचा विजय मिळवला, तर धानोरा गणात भाजपच्या वृषाली मिरकर २,२३९ मतांनी विजयी झाल्या.

८) अंधारी गट व गण:

अंधारी गटात शिवसेनेच्या मंगला तायडे (११,१२६ मते) १,६२१ मतांनी विजयी झाल्या. अंधारी गणात शिवसेनेच्या जया ताठे आणि बोरगाव सारवणी गणात शिवसेनेच्या सुरेखा शिंदे (५,६४२ मते) ३१३ मतांनी विजयी झाल्या.

९) केऱ्हाळा गट व गण:

केऱ्हाळा गटात भाजपच्या अनिता मोठे (११,८४४ मते) यांनी १३१ मतांनी विजय मिळवला. केऱ्हाळा गणात भाजपच्या सुमित्रा बनसोड आणि निल्लोड गणात भाजपचे भगवान आहेर १,३५६ मतांनी विजयी झाले.

निकाल जाहीर होताच सिल्लोड तालुक्यात कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी केली. भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षांनी आपापल्या विजयाचा आनंद साजरा करत मतदारांचे आभार मानले आहेत.

सर्वात मोठे मताधिक्य: अजिंठा गण (६,४४६ मते - शिवसेना)

सर्वात कमी मताधिक्य: भराडी गण (३४ मते - भाजप)

सत्तांतर: १० वर्षांनंतर भाजपला पंचायत समितीच्या चाव्या.

# लाखनी येथील राष्ट्रीय महामार्ग अतिक्रमणच्या विळख्यात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी भावेश धंदूकिया भंडारा** : लाखनी शहरातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेला सर्व्हिस रोड हा स्थानिक नागरिकांसाठी, दुचाकीस्वार, विद्यार्थी, वृद्ध व रुग्णांसाठी सुरक्षित वाहतुकीचा मार्ग असतो. मात्र आज हा सर्व्हिस रोड पूर्णपणे अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला आहे.



हातगाड्या, टपऱ्या, बेकायदेशीर दुकाने व पार्किंगमुळे सर्व्हिस रोडचा मूळ उद्देशच संपुष्टात आला आहे. परिणामी दुचाकीस्वार, पादचारी व विद्यार्थी थेट मुख्य महामार्गावर येण्यास भाग पडत असून, हे अपघातांना उघड निमंत्रण आहे.

विशेष म्हणजे शाळा, महाविद्यालये, रुग्णालये सर्व्हिस रोडच्या लगत असताना अतिक्रमण वाढू देणे म्हणजे निष्पाप नागरिकांच्या जीवाशी जाणीवपूर्वक खेळ होय. Control of National Highways (Land and Traffic) Act, २००२ असताना कारवाई न होणे ही गंभीर बाब आहे. राष्ट्रीय महामार्गालगत असलेला सर्व्हिस रोड हा Control of National Highways (Land and Traffic) Act, २००२ अंतर्गत संरक्षित सार्वजनिक मालमत्ता आहे. सदर कायद्याच्या कलम 26, 27 व 29 नुसार राष्ट्रीय महामार्ग किंवा सर्व्हिस रोडवर कोणतेही अतिक्रमण, बेकायदेशीर बांधकाम, हातगाडी, टपरी अथवा पार्किंग करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

तथापि, प्रत्यक्ष परिस्थितीत संबंधित सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून त्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी, विद्यार्थी व रुग्णांना मुख्य महामार्गावरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. ही बाब केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून कर्तव्यच्युती (Dereliction of Duty) ठरते.भारतीय दंड संहितेच्या कलम 268 (Public Nuisance) व कलम 283 (Danger or Obstruction in Public Way) अंतर्गत ही परिस्थिती थेट गुन्हेगारी स्वरूपाची आहे. यासोबतच, जर अतिक्रमणामुळे अपघात होऊन जीवितहानी झाली, तर संबंधित विभागांवर कलम 304A (Negligence causing death) अंतर्गतही जबाबदारी निश्चित होऊ शकते.

# सर्वांगीण अर्थसंकल्प हाच राष्ट्रीय विकासाचा आधारस्तंभ : डॉ. संजय डापके

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:** शहरातील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'अर्थसंकल्प २०२६-२७' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय डापके यांनी प्रतिपादन केले की, कुठल्याही राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जलद आर्थिक प्रगतीसाठी अर्थसंकल्प हा अत्यंत महत्त्वाचा असतो. अर्थसंकल्प हा देशाच्या भविष्यकालीन वाटचालीचा मुख्य आधारस्तंभ असून संरक्षण आणि उद्योगासोबतच दुर्लक्षित क्षेत्रांना प्राधान्य देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जी. राजपूत होते, तर व्यासपीठावर प्रा. डॉ. व्ही. बी. लांब आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ए. बी. पवार यांची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. जी. जी. राजपूत यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, मजबूत राष्ट्र आणि सुदृढ तरुण पिढीच्या शाश्वत कल्याणासाठी अर्थसंकल्प दिशादर्शक ठरतो. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कुटुंबाचाही अर्थसंकल्प तयार करून कौटुंबिक अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# ध्वनीप्रदूषणाबाबत पोलिसांचे कडक आवाहन; रात्री १० नंतर कारवाईचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड/ तालुका प्रतिनिधी** : दहावी व बारावीच्या परीक्षा तोंडावर आल्याने अनेक विद्यार्थी रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत आहेत. अशा काळात काही ठिकाणी सुरू असलेल्या लाऊडस्पीकर, डीजे व मोठ्या आवाजातील संगीतामुळे विद्यार्थ्यांसह आजारी व्यक्ती, वृद्ध नागरिक व लहान मुलांना त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर रात्री १० वाजल्यानंतर ध्वनीप्रदूषण केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दिला आहे.




सध्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने शांतता राखणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, काही ठिकाणी धार्मिक सप्ताह, लग्नसमारंभ तसेच अन्य कार्यक्रमांच्या नावाखाली पहाटे व रात्री उशिरापर्यंत लाऊडस्पीकर, डीजे व मोठ्या आवाजातील संगीत वाजवले जात असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास भंग पावत असून आजारी, वृद्ध व लहान मुलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलीस ठाणे प्रभारी भास्करराव शिंदे यांनी परीक्षाकाळात सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन केले आहे. रात्री १० वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारचा मोठा आवाज, लाऊडस्पीकर, डीजे किंवा ध्वनीप्रदूषण कायद्याने पूर्णतः प्रतिबंधित आहे. रात्री १० नंतर ध्वनीप्रदूषण आढळल्यास आयोजक व डीजे मालकांवर दंडात्मक कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

# लाभार्थ्यांच्या अनुदानाचे निराकरण

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर/प्रतिनिधी सय्यद ईसा** : माहूरच्या तहसील कार्यालयात दिनांक 10 फेब्रुवारी 2026 रोजी मागील दोन ते तीन वर्षांचे अनुदान लाभार्थी यांना मिळाले नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसील कार्यालय, माहूर येथे तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष कॅम्प घेण्यात आला. सदर कॅम्पमध्ये 210 लाभार्थी उपस्थित होते. 150 लाभार्थी यांचे पेमेंट स्टेटस हे सक्सेसफुल होते मात्र लाभार्थी यांना कोणत्या बँक खात्यावर जमा झाले हे माहित नसल्याने त्यांना अनुदान कोणत्या खात्यावर जमा झाले हे या कॅम्पमध्ये सांगण्यात आले.



तालुक्यातील 51 लाभार्थ्यांच्या सन 2022, 2023, 2024 व 2025 या वर्षाच्या अनुदानासंबंधी तक्रारी होत्या. सदर तक्रारी पैकी तहसील स्तरावरील तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यात आले आहे तर 03 तक्रारींमध्ये ई केवायसी झाली परंतु अनुदान जमा झाले नाही त्यामध्ये ई पंचनामा पोर्टलवर पाठपुरावा करण्यात येणार आहे. याच कॅम्पमध्ये 10 ई केवायसी प्रलंबित लाभार्थ्यांचे ई केवायसी करण्यात आले व 03 लाभार्थ्यांच्या ग्रिव्हन्स दाखल करण्यात आल्या आहेत. आज रोजी अनुदानासंबंधी प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा अनुदान खात्यात पडेपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल असे नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सांगितले. तसेच ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्कात राहुन अद्यावत माहिती घ्यावी अशी विनंती लाभार्थ्यांना करण्यात आली.

सदर विशेष कॅम्प जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहायक जिल्हाधिकारी. जेनित चंद्रा दोंतुला यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असुन कॅम्पच्या यशस्वीतेसाठी तहसीलदार अभिजीत जगताप कैलास जेठे नायब तहसीलदार नैसर्गिक आपत्ती विभाग, सहायक महसूल अधिकारी नैसर्गिक आपत्ती विभाग सिध्दार्थ कुलदिपके, सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी, तहसील कार्यालयातील शिपाई यांनी परीश्रम घेतले.

# घुसखोर पंडित" वेबसिरीज विरोधात महाराष्ट्र करणी सेनेची पोलिसांत धाव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रसारित होत असलेल्या " घुसखोर पंडित " या वेब सिरीजमुळे ब्राह्मण समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत महाराष्ट्र करणी सेनेने खांदेश्वर पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे तक्रार दाखल केली आहे. या वेब सिरीजचे शीर्षक व कथानक समाजात द्वेष आणि तेढ निर्माण करणारे असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

महाराष्ट्र करणी सेनेचे प्रमुख अजयसिंह सेंगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, " घुसखोर पंडित " हे नाव ब्राह्मण समाजाचा अपमान करणारे असून हिंदू धर्मासाठी पूज्य मानल्या जाणाऱ्या ब्राह्मण समुदायाची अवहेलना करण्याचा प्रयत्न यातून होत आहे. हिंदू धर्मातील प्रत्येक धार्मिक विधी ब्राह्मणांद्वारे पार पाडले जातात आणि त्यामुळे ब्राह्मण जातीचा अपमान म्हणजे संपूर्ण हिंदू धर्माचा अपमान असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेब सिरीजमुळे ब्राह्मण समाजासह विविध हिंदू संघटनांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, सामाजिक शांतता बिघडण्याची शक्यता निर्माण झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित वेब सिरीज समाजात द्वेष, असंतोष आणि धार्मिक तेढ वाढवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात आला असल्याचे सेंगर यांनी सांगितले.

या प्रकरणी वेब सिरीजचे दिग्दर्शक मनोज बाजपेयी तसेच संबंधित निर्मात्यांविरोधात भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 196, 299, 352, 353 तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम 66 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र करणी सेनेने केली आहे. पोलिसांनी तक्रार स्वीकारून पुढील तपास सुरू करावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# श्री पदी जैन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात एचएससी फेब्रुवारी 2026. पहिला इंग्रजी विषयाचा पेपर सर्व नियमाचे पालन करून व शिस्तीत पार पडला

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील** : अनसिंग येथे श्री पदी जैन विद्यालय परीक्षा केंद्रावर केंद्र संचालक म्हणून श्री दिनेश वासुदेव धोटे, व लिपिक श्री सुहास गजकुमार वाळली, तसेच अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमर चौरे, तसेच बीट जमदार, उमेश इंगोले, त्यांचे सहकारी होमगार्ड व दक्षता समितीतील श्री बालकिसन नवगणकर. श्री गजानन सातव शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्री अशोक तुकाराम गावंडे, व श्री राजेश सखाराम पाटील, व इतर सहकारी यांनी पेपर सुरळीत पार होईल याची विशेष दक्षता घेतली.



तसेच शाळेच्या प्राचार्या कु, स्वाती हिराचंद उन्होने, यांनी परीक्षेसाठी सर्व वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही तसेच विद्यार्थी बैठक व्यवस्थेचे नियोजन करून दिले. तसेच पदी जैन विद्यालय परीक्षा केंद्रावर भरारी पथक मा, साहेबराव नप्ते नायब तहसीलदार वाशिम यांनी भेट दिली.

# उभरते सितारेमध्ये 'आशेचे दीप'

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : मुलांच्या जन्मापासून ते ३ वर्षांपर्यंत त्यांच्या विकासाचा सुमारे १८ टक्के भाग पूर्ण होतो. हळूहळू त्यांच्यात विचार करण्याची व समजून घेण्याची क्षमता विकसित होते. म्हणूनच त्यांना कला आणि साहित्याच्या दिशेने प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (World Health Organization) शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम असलेली व्यक्ती म्हणजेच निरोगी माणूस. मुलांच्या वयानुसार त्यांच्याही




वेगवेगळ्या समस्या असतात. त्यामुळे त्यांनाही प्राणायाम व योगाचे शिक्षण दिले पाहिजे. यामुळे मुलांमधील चिंता (एंग्जायटी) कमी होते. हे विचार डॉ. कोमल वासनिक यांनी मुलांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये मांडले तसेच त्यांना वैद्यकीय माहितीही दिली. या प्रसंगी पद्मा इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका व मुख्याध्यापिका नीरजा प्रशांत शंभरकर विशेष उपस्थित होत्या.

विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे'चे आयोजन हिंदी मोर भवनातील उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय 'आशेचे दीप' असून तो शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणांनी परिपूर्ण होता. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून एम.डी., पीएसएम. डॉ. कोमल पुरुषोत्तम वासनिक जी उपस्थित होत्या. संयोजक युवराज चौधरी यांनी त्यांचा स्वागतवस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला.

त्यानंतर गीत-संगीतातून मुलांची सादरीकरणे प्रशंसनीय ठरली. यामध्ये आदिप्ता नंदेश्वर हिने कविता सादर केली. आदित मिंज यांनी आपल्या गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. पद्मा इंटरनॅशनल स्कूलच्या माहिरा खोबरागडे, सानवी लोहे, विहा आडे, प्रिशा कांबळे, अदिप्ता नंदेश्वर, प्रियंका महतो आदी मुलांनी अतिशय सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

मुलांच्या सादरीकरणांचे कौतुक त्यांच्या पालकांसह प्रियंका बिसेन खोबरागडे, आशा भगत, गीता सुरेश मिंज, रेखा पुरुषोत्तम वासनिक, रत्नमाला निकोडे, देवयानी आडे, विजय भगत, वैशाली मदारे, संतोष धुर्वे आदींनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक भावे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी आवाजावर नियंत्रण ठेवा – पोलीस निरीक्षक गणेश गुरव

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : इयत्ता दहावी व बारावीच्या महत्त्वाच्या बोर्ड परीक्षा सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात कोणताही अडथळा येऊ नये आणि नागरिकांना शांततापूर्ण वातावरण मिळावे, यासाठी निफाड पोलीस स्टेशनतर्फे ध्वनीप्रदूषणाबाबत महत्त्वाचे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी नागरिकांना कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करत नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

सध्या अनेक विद्यार्थी रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत असून त्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी या परीक्षा थेट जोडलेल्या आहेत. अशा संवेदनशील काळात काही ठिकाणी धार्मिक सप्ताह, लग्न समारंभ तसेच इतर सामाजिक कार्यक्रमांदरम्यान पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत लाऊडस्पीकर, डीजे आणि मोठ्या आवाजातील संगीत वाजवले जात असल्याचे प्रकार पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आले आहेत. या वाढत्या ध्वनीप्रदूषणामुळे विद्यार्थ्यांबरोबरच आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी नागरिकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून सहकार्य करणे अत्यंत गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक कायद्यानुसार रात्री १०.०० (२२.००) वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारचा मोठा आवाज, लाऊडस्पीकर, डीजे अथवा कर्णकर्कश संगीत वाजवण्यास सक्त मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करून रात्री १० नंतर आवाज आढळल्यास संबंधित कार्यक्रम आयोजक तसेच डीजे मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रियाही राबविण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

परीक्षेच्या काळात शांत, अभ्यासपूरक वातावरण निर्माण व्हावे यासाठी सर्व नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, कार्यक्रमांचे वेळापत्रक कायद्याच्या चौकटीत ठेवावे आणि ध्वनीप्रदूषण टाळावे, असे आवाहन निफाड पोलीस स्टेशनतर्फे करण्यात आले आहे. सामाजिक भान राखत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने संवेदनशीलता दाखवावी, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.



# प्रकट दिनानिमित्त रिसोड येथे विविध कार्यक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणजीत ठाकूर**
**रिसोड :** रिसोड गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त रिसोड येथे विविध कार्यक्रम पार पडले. कोठुळे परिवार व कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त ८ फेब्रुवारी रोजी बसस्थानक तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात पाणपोईचा शुभारंभकरण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिसोड नगरपरिषदेचे अध्यक्ष भगवानराव क्षीरसागर होते. प्रमुख पाहूणे म्हणून बाजार



समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर, संचालक गजानन पाचरणे व अन्य संचालक उपस्थित होते. यावेळी भारत अण्णा कोठुळे यांच्या पाणपोईचा उद्घाटन समारंभनगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर यांच्या हस्ते फीत कापून पार पडला. याप्रसंगी रिसोड नगरपरिषदेचे उपाध्यक्ष विष्णू कदम, पाणीपुरवठा सभापती संजय बगडिया, स्वप्नील इरतकर, सागर डांगे, मयूर नकताल तसेच बाजार समितीतील व्यापारी, आइते, हमाल, मापारी आणि कोठुळे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने सुमारे १०० गरजवंत महिलांना साडी-चोळीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास वामनराव देशमुख, भारत कोकाटे, प्रभू अण्णा जिरवणकर, रामभाऊ नरवाडे, उद्धव खरबळ, अरुण क्षीरसागर, पुरुषोत्तम तोष्णीवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# रिसोड तहसील कार्यालयात भटक्या कुत्र्याचे प्राण वाचवणारी उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (तालुका प्रतिनिधी)/रणजितसिह. ठाकूर :** आज दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६.४५ वाजता रिसोड तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात एक भटका कुत्रा अचानक गेटमध्ये अडकला. गेटमध्ये मान अडकल्यामुळे कुत्रा प्रचंड अस्वस्थ झाला होता व जीव वाचवण्यासाठी धरपड करत होता. हा प्रकार पाहून परिसरातील स्थायिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी संपर्क साधण्यास सुरुवात केली.

परिस्थितीची गंभीरता ओळखून नागरिकांनी विनोद बांगर, नगर परिषद रिसोड, पाणीपुरवठा विभाग यांच्याशी संपर्क साधला. कोणताही विलंब न करता विनोद बांगर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत गोविंद बाबुरावजी घुले



आणि जयंत धैर्यशील जोशी यांनीही मदतीसाठी पुढाकार घेतला.

सर्वांनी मिळून अत्यंत काळजीपूर्वक आणि संयमाने गेटमध्ये अडकलेल्या कुत्र्याला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. कुत्र्याला कोणतीही इजा होऊ न देता गेट उघडून त्याची अडकलेली मान बाहेर काढुन कुत्र्याचा जीव वाचवला या मुळे विनोद बांगरची प्रशंसा होत आहे.

# सणसर ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम जलशुद्धीकरण प्रकल्पाचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय :** सणसर ता.इंदापूर ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून गावात जलशुद्धीकरण प्रकल्पाचे उद्घाटन सरपंच यशवंत पाटील व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे गावातील नागरिकांना शुद्ध, सुरक्षित व आरोग्यदायी पाणी उपलब्ध होणार आहे. सणसर ग्रामपंचायतीच्या निधीतून व शासनाच्या योजनांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात आला असून,पाण्यातील दूषित घटक दूर करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे.

ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले



की,हा प्रकल्प गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. गावकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून,भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ पाणी उपलब्ध होईल याचा आनंद व्यक्त केला आहे.

यावेळी माजी सरपंच पार्थ निंबाळकर सोसायटीचे संचालक पिंटू गुप्ते यात्रा कमिटी खजिनदार मिथुन बारवकर पत्रकार रियाज सय्यद किरण गायकवाड शैलेश काळे संगम खवळे निलेश वाघ पै.राजाभाऊ निंबाळकर धनंजय दुबळे ग्रामपंचायत सदस्य अभयराजे निंबाळकर दिपक चव्हाण ताराबाई भाग्यवंत निशिगंधा शहाणे ज्योस्त्ना भोईटे अरुणा खवळे गायकवाड ताई ग्रामविकास अधिकारी सचिन पवार कर्मचारी प्रवीण शिंदे योगेश शेलार जगदीश चितारे उपस्थित होते.

# माऊंट लिट्रा झी स्कूलचे विद्यार्थी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत अव्वल

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** येथील माऊंट लिट्रा झी स्कूलचे विद्यार्थी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करून शाळेचे नावलौकिक केले. सदर राज्यस्तरीय स्पर्धा अनसिंग येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातून 322 स्पर्धकांनी सहभाग घेतले. सदर शाळेचे विद्यार्थीनी अलीना खतीब ,जिज्ञा पवार, श्लोक खोंड या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले.जानवी मगर, देवांशी पवार ,



अरहम खतीब, पार्थ पवार, पलक नाज, अनम नाज, तेजश्री काष्टे, निधी पवार या विद्यार्थ्यांनी कराटेचे उत्कृष्ट सादरीकरण करून सिल्वर मेडल व ब्रांज मेडल प्राप्त केले. सदर शाळेत विद्यार्थ्यांना कराटेचे दररोज प्रशिक्षण दिल्या जाते. त्यामुळे सदर शाळेचे विद्यार्थी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये उत्कृष्ट असे सादरीकरण उज्वल यश प्राप्त केले.

सदर विद्यार्थ्यास मार्गदर्शन बालकिशन नवघनकर व तिवारी मॅडम यांनी केले. सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ ,शाळेचे अकॅडमी डायरेक्टर, शाळा समन्वयक, प्रशासन अधिकारी ,सर्व क्रिडा प्रशिक्षक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

# परदेशातून येणाऱ्या सीगल पक्ष्यांचे जीव धोक्यात – मर्मगंध लक्ष्मण पाटील

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** हिवाळ्यात समुद्र किनाऱ्यावर आढळून येणाऱ्या सीगल हा पांढऱ्या – राखाडी रंगाचा पक्षी आहे जो ५०००-६००० किमीचे अंतर कापून सायबेरिया ( रशिया ) येथून भारतात विशेषतः कोकण किनारपट्टीवर स्थलांतर करतात.हे पक्ष्यांचे विशेष म्हणजे हे थव्याने राहतात व गोंगाट करत असतात त्यांचा आकार साधारणतः डोमकावळ्यापेक्षा मोठा असतो.तसेच हे पक्षी उड्डाणासाठी आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ओळखले जातात हिवाळ्यात त्यांचा रंग पांढरा असतो तर उन्हाळा येई पर्यंत त्यांचा रंग तपकिरी होतो.

प्रामुख्याने त्यांचे खाद्य मासे,किटक,लहान जीव तसेच कचऱ्यात मिळणारे अन्न असते.



परंतु जे नागरिक समुद्र किनारी फिरायला येतात व समुद्रात बोटीवर आनंद घेण्यासाठी जातात. त्यांना हे पक्षी जवळ येवून खाद्य खातात त्याचे आकर्षण वाटते म्हणून ते त्यांना तेलकट उदा. लेस,कुरकुरे इ.पदार्थ खायला देतात ते त्यांचे नैसर्गिक खाद्य नसल्याने त्यांना त्याचा त्रास होतो व त्यांचे आयुष्य देखील कमी होत आहे. पक्ष्यांना हे पदार्थ बोटीवर खायला देवू नये अश्या प्रकारचे होल्डिंग लावलेले असताना देखील हे प्रकार पहावयास मिळत आहेत. त्यामुळे त्यांचे आयुष्य कमी होते.

कित्तेक मैलाचे अंतर कापून येणारे पक्षांचे अश्या कारणाने मृत्त्यूमुखी पडत असतील तर ते चुकीचे आहे.अश्या कारणामुळे त्यांच्या प्रजातीवर परिणाम होवून त्या लुप्त होवू शकतात.ते त्यांच्या मायदेशात परत जाणे हि आपली नैतिक जबाबदारी असून त्यांचे जीवन सुखकर व्हावे.जेणे करून ते दरवषी आपल्या देशात येत राहावे.याबाबत महाराष्ट्र वन विभाग व पशुसंवर्धन विभागाने लक्ष घालावे हि अपेक्षा.

# ठाण्यात 'शिवचरित्र अभिव्यक्ती व लाठीकाठी स्पर्धा' उत्साहात

## श्रीवर्धनच्या 'शिवाज्ञा' किशोरींचा द्वितीय क्रमांकावर झेंडा

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** सेवा सहयोग फाऊंडेशन आणि महानगर गॅस लिमिटेड संचालित किशोरी विकास प्रकल्पा अंतर्गत आयोजित 'शिवचरित्र अभिव्यक्ती व लाठीकाठी स्पर्धा' ठाणे येथे उत्साहात संपन्न झाली. श्रीवर्धन, महाड, माणगाव, ठाणे, खोपोली, कर्जत, पालघर, शहापूर, मुंबई, नवी मुंबई आणि चेंबर ११ अशा ११ विभागांतील एकूण १३ किशोरी वर्गांनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महानगर गॅस लिमिटेडच्या अभियांत्रिकी नियोजन व्यवस्थापक मा. प्रज्ञा धुमाळ व सहाय्यक व्यवस्थापक मा. प्रियंका दळवी उपस्थित होत्या. तसेच मुंबई एव्हिएशन फ्युएल फार्म फॅसिलिटी प्रा. लि. (MAFF-FL) चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सतिशजी पाटणकर, बर्न्स अँड मॅकडोरेल इंडिया चे जनरल मॅनेजर मा. केतनकुमारजी मेअर, मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मेधाजी




तापियावाला आणि 'तरुण भारत'च्या पत्रकार मा. योगिता साळवी यांची विशेष उपस्थिती लाभली.

लाठीकाठी स्पर्धेचे परीक्षक म्हणून आरएसपी ठाणे शहर समन्वयक बाळा साठे व मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेते सुरेंद्रजी शिंदे उपस्थित होते. तर शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धेचे परीक्षण अभिनेत्री स्मिता भोसले धुमाळ आणि कोकण इतिहास परिषदेच्या संस्थापक सदस्या भारती जोशी यांनी केले.

या प्रसंगी सेवा सहयोग फाऊंडेशनचे संचालक किशोरजी मोघे, प्रकल्प PEC सदस्य डॉ. अस्मिता हेगडे, डॉ. भावना मिस्त्री, वर्षा परब, प्रकल्प प्रमुख आरती नेमाने, सहाय्यक प्रकल्प प्रमुख सोनाली वाणी व पुनम घरत उपस्थित होत्या. श्रीवर्धन विभाग समन्वयक अपर्णा बंदरकर तसेच विभागातील किशोरी विकास प्रमुख कावेरी करदेकर, सुप्रिया करदेकर, वैशाली सावंत आणि सई दवटे यांनीही मार्गदर्शन केले.

स्पर्धेत श्रीवर्धन विभागातील 'शिवाज्ञा' किशोरी वर्गाने "सिंधुदुर्ग किल्ला" या विषयावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा प्रभावी इतिहास सादर करत द्वितीय क्रमांक पटकावला. हे पथनाट्य दर्पण दिपक जाधव यांनी लेखन व दिग्दर्शन केले होते, तर सिद्धेश रघुवीर यांनी पखवाजाची साथ दिली. मुलींच्या आत्मविश्वासपूर्ण अभिव्यक्ती आणि शिस्तबद्ध लाठीकाठी सादरीकरणाने उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

किशोरी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून मुलींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संस्कारांची जोपासना होत असून, श्रीवर्धनसाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला आहे. सेवा सहयोग फाऊंडेशनतर्फे अशा उपक्रमांद्वारे ग्रामीण व शहरी भागातील मुलींना सक्षम करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

# तुमसर नगराध्यक्षांचा पदभार स्वीकारताच 'ॲक्शन मोड'; सेवानिवृत्तांच्या रखडलेल्या १७ लाखांचा प्रश्न मार्गी

## अकरा कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा; इंजि. सागर गभने यांच्या संवेदनशील निर्णयाचे शहरात कौतुक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ अमृतलाल चरडे :** तुमसर येथील नगरपरिषदेचे नवनियुक्त नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांनी आपल्या कार्याची चुणूक दाखवत गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावला आहे. सन २०२३ पासून रखडलेले सुमारे १७ लाख रुपयांचे वेतन कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असून, यामुळे अनेक दिवसांपासून आर्थिक विवंचनेत असलेल्या ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**नेमके प्रकरण काय?**

तुमसर नगरपरिषदेत सेवा बजावून निवृत्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांचे नियुक्तीनंतरचे थकीत वेतन तांत्रिक कारणांमुळे प्रशासकीय स्तरावर अडकले होते. अनेक वेळा पाठपुरावा करूनही हा प्रश्न सुटत नसल्याने ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर होता. ही बाब कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांच्या निदर्शनास आणून दिली.

**१५ दिवसांत कार्यवाही पूर्ण**



नगराध्यक्षांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून प्रशासनाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. केवळ सूचना न देता, १५ दिवसांच्या मर्यादेत ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, याची खबरदारी घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार प्रशासनाने गतीने हालचाली करून १७ लाख रुपयांचा निधी कर्मचाऱ्यांना वितरित केला.

**या कर्मचाऱ्यांना मिळाला लाभ:**

या निर्णयामुळे कुमुद गोपाल साखरवाडे, द्वारकाप्रसाद शामलाल राणे, जयकिशोर काशीराम पंचभुदे, रविशंकर भागवत कौशल, रीता दिलीप सांडेकर, प्रकाश दयाराम मारवाडे, राजू गुलाब बघेले, दारदर्शन बाबुराव गाडगे, राजू रामकृष्ण बावनकर, पुरुषोत्तम बाबू नागमोते आणि देवाजी उमराव कुकडे या ११ सेवानिवृत्तांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले आहे.

कृतज्ञता आणि सत्कार: आपल्या हक्काची रक्कम मिळाल्यानंतर सर्व लाभार्थी कर्मचाऱ्यांनी नगरपालिकेत जाऊन नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांची भेट घेतली. यावेळी सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्षांचे आभार मानले. पदभार स्वीकारताच जनसामान्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याच्या नगराध्यक्षांच्या या कार्यपद्धतीमुळे नगरपरिषद वर्तुळात सकारात्मक संदेश गेला आहे.

नगरपरिषदेचे कर्मचारी हे प्रशासनाचा कणा आहेत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे २०२३ पासून प्रलंबित असणे ही खेदजनक बाब होती. निवृत्तीनंतर या ज्येष्ठांना औषधोपचार किंवा कौटुंबिक गरजांसाठी पैशांची नितांत गरज असते. ही केवळ प्रशासकीय फाईल नव्हती, तर त्यांच्या भावनांचा प्रश्न होता. त्यामुळे पदभार स्वीकारताच मी या प्रकरणाला प्राधान्य दिले. यापुढेही कोणाचेही हक्काचे पैसे किंवा जनतेची कामे विनाकारण अडकणार नाहीत, याची आम्ही खबरदारी घेऊ.

# रामनवमी यात्रेसाठी प्रशासन अलर्ट मोडवर!; भाविकांच्या सुरक्षेसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे कडक आदेश"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम रामनवमी यात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत यात्रा शिस्तबद्ध, सुरक्षित व सुव्यवस्थित पद्धतीने पार पडावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे कडक निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

येत्या २६ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या रामनवमी यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर होते.



या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, विधान परिषद सदस्य आ. महंत बाबूसिंग महाराज यांचे प्रतिनिधी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यात्रोत्सवाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित असल्याने सुरक्षितता, वाहतूक नियोजन, गर्दी नियंत्रण, आरोग्य सुविधा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा तसेच अग्निशमन व आपत्कालीन सेवांची पूर्वतयारी वेळेत पूर्ण करण्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्षता बाळगून काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस प्रशासनाने संवेदनशील ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवावा. आरोग्य विभागाने प्राथमिक उपचार केंद्र, रुग्णवाहिका व वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत. सार्वजनिक बांधकाम व ग्रामविकास विभागाने रस्ते, प्रकाश व्यवस्था व तात्पुरत्या संरचनांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी. नगर परिषद व स्थानिक संस्थांनी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व शौचालयांची पुरेशी व्यवस्था करावी, असे निर्देश देण्यात आले.

बैठकीत एस.टी. बसेसच्या अतिरिक्त फेऱ्या, राज्य उत्पादन शुल्क विभागाची गस्त, बॅनर व साऊंड सिस्टीमचे नियमन, विविध पथकांची नियुक्ती, आवश्यक ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था, मंदिर परिसरातील पोलीस बंदोबस्त, मोबाईल शौचालये व स्नानगृहे, मोबाईल टॉवर कंपन्यांशी समन्वय, जनावरांचे लसीकरण, पाणी शुद्धीकरण, हॉटेल्सची तपासणी तसेच योग्य बॅरिकेडींग यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यात्रोत्सवाच्या कालावधीत संबंधित यंत्रणांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्यांचे काटेकोर पालन करून सर्व कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. काही अधिकारी दुरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. पोहरादेवी व उमरी येथील मंदिर समितीचे ट्रस्टीही उपस्थित होते.

# वेल्हम गर्ल्स स्कूलच्या 1957 मधील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे मुंबईत आयोजन

## क्रीडा संकुल बांधण्यासाठी प्रमिला नझीर यांचे योगदान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** 69 वर्षांचा वारसा असलेल्या वेल्हम गर्ल्स स्कूल येथे अलीकडेच मुंबईतील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात सुरुवातीच्या बॅचपासून ते अगदी अलीकडच्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांचा सहभाग होता. शाळेतील आपल्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ते एकत्र आले होते.

या मेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे, 1957 मध्ये वेल्हम गर्ल्स स्कूलमध्ये सर्वप्रथम प्रवेश घेतलेल्या आणि रोल नंबर 1 असलेल्या श्रीमती प्रेमिला नझीर यांची उपस्थिती. या निमित्ताने, श्रीमती नझीर यांनी शाळेच्या क्रीडा संकुलाच्या बांधकामात योगदान दिले. या कार्यक्रमादरम्यान विद्यमान प्राचार्य सुश्री विभा कपूर यांच्याकडे ते सादर करण्यात आले.

क्रीडा सुविधा मजबूत करणे आणि विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा या सुविधेचा उद्देश आहे.



नझीर यांच्या शाळेतील मैत्रिणी आरती वालिया आणि अनिता विज यांच्या स्मरणार्थ हे योगदान देण्यात आले आहे, दुर्दैवाने त्या आता आपल्यात नाहीत. नझीर यांची मैत्रिणींप्रती आत्मीयता वेल्हम गर्ल्स स्कूलमध्ये निर्माण झालेल्या कायमस्वरूपी मैत्रीचे प्रतिबिंब आहे.

# महागाव नगराध्यक्षावर अविश्वास प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे कडे दाखल !

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सूरोशे/महागाव ( यवतमाळ) :** महागाव नगरपंचायतच्या अध्यक्षा सौ. सुनंदा दिलीप सुरोशे (कोपरकर) यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. महागाव नगरपंचायत सभागृहातील १२ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या समक्ष हा अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला. भाजपाचे नगरसेवक गजानन सोपान साबळे,सुरेश उत्तमराव नरवाडे, सौ. रंजना दीपक आडे, आणि सौ. आशा शंकर बावणे. शिवसेनेचे नगरसेवक प्रमोद उर्फ शाका भरवाडे,रामराव काशिनाथ नरवाडे, विशाल प्रकाश पांडे, सौ. सुनीता शिवाजी डाखोरे आणि सौ. करुणा नारायण शिरबिरे. सत्ताधारी काँग्रेसचे नगरसेवक मो. परवेज शफी सुरैया,श्रीमती जयश्री अशोक इंगोले आणि सौ. जयश्री संजय



नरवाडे यांनी हा प्रस्ताव दाखल केला. विशेष म्हणजे, उपनगराध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे यांनी नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केली असून ते स्वतः जिल्हा कचेरीत अविश्वास प्रस्ताव दाखल करताना उपस्थित होते. आता महागाव नगरपंचायत सभागृहात ठराव पारित करण्यासाठी प्रत्यक्ष मतदान केले जाणार आहे.

# तळा केंद्रावर १२ वी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांततेत सुरू

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली आहे. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा केंद्र क्रमांक २७४१ बारावी फेब्रुवारी - मार्च २०२६ ची बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांत वातावरणात पार पडत आहे. या परीक्षेसाठी राज्यात १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बारावीची विद्यार्थीसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य



काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तळा केंद्रावर कला शाखा ७०, वाणिज्य शाखा ७३ तर विज्ञान शाखा ९४ असे एकूण २३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के, अध्यक्ष श्री मंगेश देशमुख, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री महेंद्रशेठ कजबजे, शाळा समितीचे चेअरमन श्री श्रीराम कजबजे, प्राथमिक विभागाचे चेअरमन श्री महादेव बैकर, पन्हेळी हायकुलचे चेअरमन श्री बी के पटेल, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, पर्यवेक्षक श्री महादेव लोकरे आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तळा केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून प्राध्यापक बोळेगावे आय बी, केंद्र उपसंचालक प्राध्यापक गायकवाड पी एम, स्टेशनरी सुपरवायझर श्री किरण नागावकर, लिपिक स्वप्निल वरंडे तर शिपाई म्हणून प्रसाद सुतार काम पाहत आहेत. झूम ॲपद्वारे रायगड जिल्हाधिकारी यांना तळा केंद्रावरील परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, शांतता, पोलीस बंदोबस्त व बैठे पथकांच्या उपस्थितीत पार पडत असल्याचे लाईव्ह चित्रीकरण दाखवण्यात येत आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे म्हणाले की, 'एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी 3 फेब्रुवारीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले. विद्यार्थ्यांनी राज्य मंडळामार्फत प्रसिद्ध आणि छपाई केलेलेच वेळापत्रक ग्राह्य धरावे. गेल्या वर्षीप्रमाणेच परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या ९ जानेवारीच्या शासननिर्णयानुसार परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील छायांकित प्रतीची दुकाने (झेरॉक्स केंद्र) बंद ठेवणे, संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करणे आदी सूचना देण्यात आल्या आहेत.

# मुख्याध्यापकाकडून विद्यार्थिनीवर अत्याचार, शिक्षकी पेशाला काळीमा; पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल; आरोपी अटकेत

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** शिक्षक हा ज्ञान संस्कार आणि सुरक्षिततेचा आधार असतो मात्र याच पेशाला काळीमा फासणारी धक्कादायक घटना घाटंजी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या एका जिल्हा परिषद शाळेत उघडकीस आली असून मुख्याध्यापकाने सातवीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

किशोर मालवीय वय ५० राहणार यवतमाळ असे संशयित मुख्याध्यापकाचे नाव आहे. ५ फेब्रुवारी गुरुवारला या मुख्याध्यापकाने विद्यार्थिनीला 'मी तुला फोन करेन, तू मला रात्री बस स्थानकावर येऊन भेट' घरी सांगितल्यास तुला मारून टाकीन, असे धमकावले होते. त्यानुसार रात्री ११ च्या सुमारास त्याने फोन करून विद्यार्थिनीला बोलाविले. तिथे हा नराधम



चार चाकी वाहनात बसलेला होता. त्या वानातच त्या मुलीला त्याने जबरीने बसविले व वाहनातच त्याने तिच्यावर अत्याचार केला. रात्री उशिरा घरी परतल्यावर पालकांनी विश्वासात घेऊन विचारणा केल्यानंतर मोबाईल मधील कॉल रेकॉर्डिंग मुळे संपूर्ण प्रकार उघडकीस आला. या संदर्भात अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिनांक ७ रोजी घाटंजी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यात मुख्याध्यापक मालवीय हा शाळेत कार्यरत असताना दारूच्या नशेत राहत होता. तसेच शाळेतील एका अल्पवयीन मुलीला पाहून अश्लील हावभाव व चुकीच्या पद्धतीने इशारे करत असतो, असेही लेखी तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी आरोपीचे लोकेशन ट्रेस करत नागपूर व यवतमाळ येथे शोध मोहीम राबवली आणि अखेर यवतमाळ येथील निवासस्थानी त्याला अटक केली. साहेब पोलीस निरीक्षक सचिन राठोड, प्रवीण तालकोतुलवार यांनी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली.

पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की तक्रारच गुन्हेगारांना रोखू शकते, नुकताच एका प्रतिष्ठित तंत्रनिकेतन महाविद्यालयातही विद्यार्थिनीशी छेडछाड झाल्याचा प्रकार समोर आला होता. मात्र त्या प्रकरणात तक्रार दाखल न झाल्याने तो प्रकार दडपला गेला. अशाच प्रकारे अनेक घटना केवळ भीती, बदनामी, धास्ती किंवा सामाजिक दबावामुळे पुढे येत नाहीत आणि गुन्हेगार निर्धास्तपणे मोकळे फिरत राहतात, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. "अशा घटनांना आळा घालायचा असेल तर मुलींनी धैर्याने पुढे येणे आणि पालकांनी त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहणे अत्यंत गरजेचे आहे. तक्रार दाखल झाली तरच कायद्याची चक्र फिरतात आणि दोषींवर कठोर कारवाई शक्य होते. गप्प बसणे म्हणजे गुन्हेगारांना अप्रत्यक्ष पाठबळ देण्यासारखे आहे, "असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. शाळा महाविद्यालय आणि ग्रामीण भागात पोस्को कायदा व महिलांच्या सुरक्षेसंदर्भात जनजागृती मोहीम राबवण्याची गरज असून, शिक्षण विभागानेही याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले..

# राज्यस्तरीय अबॅकस कॉम्पिटिशन मध्ये किंगसन अबॅकस अकॅडमीचे अभूतपूर्व यश

**दैनिक युवक आधार|**

**केज प्रतिनिधी :** रविवार दिनांक 8 फेब्रुवारी रोजी छत्रपती नगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय जी चॅम्प अबॅकस कॉम्पिटिशन मध्ये गेवराई येथील श्रीमती वेदिका चाळक संचालित किंग्सन अबॅकस अकॅडमी येथील 26 पैकी तेरा विद्यार्थ्यांना सुपरस्टार, सिल्वर स्टार ट्रॉफी व गोल्ड मेडल व सन्मानपत्र बक्षीस मिळाले.

संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यातून विविध जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने मुलांनी उपस्थित दर्शवली होती त्यामध्ये वेदिका चाळक यांच्या मार्गदर्शनाखाली किंग्सन अबॅकस अकॅडमीच्या 26 पैकी तेरा विद्यार्थ्यांनी




अवघ्या दहा मिनिटांमध्ये 100 गणिते सोडून अभ्यासाच्या माध्यमातून आपले विविध ट्रॉफी व मेडलवर आपलीनाव कोरले व व गेवरातील विद्यार्थ्यांचा संभाजीनगर येथे डंका वाजला..

या विद्यार्थ्याला मुलाचे मार्गदर्शन करत वेदिका चाळक मिस यांनी मागील सहा वर्षांपासून जिच्या अबॅकस या कंपनीची फ्रेंच तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणिताची आवड व स्मरणशक्ती मध्ये वाढ होण्यासाठी अबॅकस शिकवणीतून अशी विद्यार्थी घडवून आणलेले आहेत.

# एकता महिला मंडळ, पनवेलतर्फे १३ फेब्रुवारीला 'संस्कृती रक्षक' व 'समाजभान' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल:** भारतीय राष्ट्रीय महिला दिन आणि सरोजिनी नायडू यांच्या जयंती निमित्त, 'एकता महिला मंडळ, पनवेल' यांच्या वतीने एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात 'संस्कृती रक्षक' आणि 'समाजभान' पुरस्कार २०२६ चे वितरण व इतर विविध पारितोषिक वितरण संपन्न होणार आहे.




कार्यक्रमाचे प्रमुख तपशीलया सोहळ्यास खालील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे: प्रमुख अतिथी: मा. डॉ. नीता ताटके

अध्यक्ष: मा. डॉ. जयश्री पाटीलपुरस्कार विजेतेयावर्षी समाजात मोलाचे योगदान देणाऱ्या तीन कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात येणार आहे:

१. संगीता लाड: समाजभान पुरस्कार.

२. ईशा देसाई: संस्कृती रक्षक पुरस्कार.

३. प्रचिती देसाई: संस्कृती रक्षक पुरस्कार.

विशेष आकर्षण: महिलांचे मल्लखांब प्रात्यक्षिक

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे दादर येथील सुप्रसिद्ध 'श्री समर्थ व्यायाम मंदिर' यांच्या खेळाडूंतर्फे सादर केले जाणारे महिलांचे मल्लखांब प्रात्यक्षिक हे असणार आहे.

**वेळ आणि स्थळ**

मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुनीता खरे, उपाध्यक्षा सौ. विजया एरंडे आणि सचिव सौ. सुलक्षणा टिळक यांनी सर्व नागरिकांना या सोहळयास उपस्थित राहण्याचे आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

दिनांक: शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६

वेळ: दुपारी ४:०० वाजता

स्थळ: काँग्रेस भवन, नित्यानंद मार्ग, उपजिल्हा रुग्णालयाजवळ, पनवेल.

# लाखनीतील सेतू केंद्र संचालकाला ११ हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक!

## मूळ कागदपत्रे परत देण्यासाठी मागितली होती लाच; एसीबीचा सापळा यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी भावेश धंदूकिया**

**भंडारा/लाखनी :** शासकीय कामासाठी दिलेली विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे परत करण्याच्या मोबदल्यात ११ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या सेतू केंद्र संचालकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहाथ अटक केली. ही धडक कारवाई लाखनी येथील सिंधी लाईन चौकातील 'नेहा सेतू केंद्रा'त मंगळवारी करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरात आणि सेतू केंद्र चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

सतीश तुळशीराम मोटघरे, असे अटक करण्यात आलेल्या आरोपी केंद्राच्या संचालकाचे नाव आहे.

तक्रारदार हे नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत. त्यांनी २०२१ मध्ये



आपल्या मुलांच्या शिष्यवृत्तीसाठी नेहा सेतू केंद्रामार्फत ऑनलाइन अर्ज केला होता. यावेळी संचालक सतीश मोटघरे याने मुलांची १० वीची गुणपत्रिका, डोमिसाईल प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड आणि कामगार कार्ड अशी सर्व मूळ कागदपत्रे स्वतःकडे ठेवून घेतली होती. शिष्यवृत्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही तक्रारदाराने वारंवार मागणी करूनही मोटघरे कागदपत्रे परत देत नव्हता.

**अशी केली केली वसुली**

कागदपत्रे परत करण्यासाठी आरोपीने ३० जानेवारी रोजी तक्रारदाराकडे १२ हजार रुपयांची मागणी केली. यात त्याने सहायक कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्याचा वाटा आणि स्वतःचे कमिशन असल्याचे सांगितले. अखेर ११ हजार रुपयांवर तडजोड झाली. लाचेची रक्कम दिल्याशिवाय कागदपत्रे मिळणार नाहीत हे लक्षात आल्यावर तक्रारदाराने भंडारा एसीबीकडे धाव घेतली.

**असा रचला सापळा**

३ फेब्रुवारी रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर आज १० फेब्रुवारी रोजी दुपारी नेहा सेतू केंद्रात एसीबीने सापळा रचला. तक्रारदाराकडून ११ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पथकाने मोटघरेला रंगेहाथ ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कमेसह वनप्लस कंपनीचा महागडा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. सध्या आरोपीच्या घराची झडती सुरू असून लाखनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूरच्या पोलीस अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर, विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनात उपअधीक्षक डॉ. अरुणकुमार लोहार, पोलीस निरीक्षक नितेश देशमुख, उज्वला मडावी आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

# रायगडमध्ये कॉंग्रेसचा झेंडा डौलाने फडकतोय : महेंद्रशेठ घरत

## 'सुखकर्ता'वर महेंद्रशेठ घरत यांनी केला विजयी उमेदवारांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांत महाराष्ट्रात भाजपची घोडदौड सुरू आहे. आमचा मित्र पक्ष असलेल्या शेकापची रायगड जिल्ह्यात अनेक वर्षे एकहाती सत्ता होती, परंतु त्यांनाही यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही. असे असताना रायगडमध्ये आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून तीन जागा लढवल्या आणि दोन जिंकल्या. त्यामुळे आमचा कॉंग्रेसचा झेंडा रायगडमध्ये डौलाने फडकतोय, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. हे सर्व यश महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांचे आहे. तन, मन, धनाने काम केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना मी सॅल्यूट करतोय," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले.

शेलघर येथे 'सुखकर्ता' बंगल्यावर महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते जिल्हा परिषद सदस्य म्हणून विजयी झालेले डॉ. मनीष



पाटील, ॲड. अविनाश ठाकूर यांचा सत्कार मंगळवारी (ता.१०) करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ. मनीष पाटील म्हणाले, "मी जासई मतदारसंघातून बहुमतांनी निवडून आलो. यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून काम केले, हे मी कधीही विसरणार नाही. धनशक्तीविरुद्ध आमचा लढा होता, तो आम्ही आमचे नेते महेंद्रशेठ घरत यांच्या मार्गदर्शनाखाली जिंकला आहे."

यावेळी अविनाश ठाकूर म्हणाले, "महाविकास आघाडीचे सर्वच नेते आणि कार्यकर्त्यांच्या बळावर मी जिंकलो. जिल्हा परिषदेची लढाई सोपी नव्हती, पण जनशक्ती आमच्या मागे होती. त्यामुळे आमचा विजय झाला. त्यामुळ सर्व कार्यकर्त्यांचे मी मनापासून आभार मानतो."

उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे म्हणाले, "आमच्या मागे ठामपणे महेंद्रशेठ घरत होते. माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि शेकाप, मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही हिरीरीने प्रचारात उतरले होते. त्यामुळे हा कार्यकर्त्यांचा विजय आहे."

"उरणमध्ये पंचायत समितीवर महाविकास आघाडीचीच सत्ता येईल, असे मी म्हणालो होतो, ते कार्यकर्त्यांनी अपार मेहनतीने करून दाखवले आहे. उरणमध्ये आमचा भावना पॅटर्न चालला, येत्या काळातही आम्ही कार्यकर्त्यांच्या बळावर जोमाने लढू," असेही महेंद्रशेठ घरत यावेळी म्हणाले.


यावेळी काँग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, अलंकार परदेशी, जयवंत पाटील, किरण कुंभार, घनश्याम पाटील, शेखर ठाकूर, अजय म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, अलंकार पाटील, अजित ठाकूर, मनोज पाटील, मंगेश म्हात्रे, भाई पाटील, समीर ठाकूर, सुनील वर्तक, मीलन म्हात्रे, आकाश ठाकूर आदी काग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेत खाते असलेल्या रास्त भाव दुकानदारांचे ७. महिन्याचे कमिशन केव्हा मिळणार ?

## रास्त भाव दुकानदारांवर उपासमारीची पाळी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** महाराष्ट्र ग्रामीण बँकेत खाते असलेल्या रास्त भाव दुकानदारांचे मागील ७ महिन्यापासून सरकारी रास्त भाव दुकानदारांचे कमिशन मिळालेले नाही. त्यामुळे रास्त भाव दुकानदार आर्थिक अडचणीत सापडलेला असून त्यांनी आपला उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न निर्माण झालेला आहे. शासनाच्या अन्नपुरवठा विभागाने याकडे तात्काळ लक्ष घालून या दुकानदारांचे थकीत असलेले ७ महिन्याचे कमिशन तात्काळ देण्यात यावे अशी मागणी रास्त भाव दुकानदारांची आहे . त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे अन्नपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी याकडे तात्काळ लक्ष घालून दुकानदारांना मिळत असलेली अल्प कमिशन तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात यावे व दुकानदारांना काम



करण्याची एनर्जी प्राप्त करावी अशी मागणी सुद्धा दुकानदारांच्या वतीने करण्यात येत आहे. एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार महिन्याला वेळेवर मिळाला नाही तर त्यांच्यावर उपासमारीची पाळी येते मग या रास्त भाव दुकानदारांना अल्प कमिशन मिळते त्यांची परिस्थिती काय असेल याचे गांभीर्य शासनाने ओळखावे. आज पर्यंत आलेल्या सरकारने सर्वांचे भले केले परंतु राशन दुकानदारांना फक्त कमिशन देऊन एजंट , दलाल बनवून त्यांच्याकडून कार्डधारकांना धान्य वाटप करण्याचे काम सुरू आहे.परंतु त्यांना मानधन किंवा वेतनश्रेणीचा विचार मागील पन्नास वर्षापासून करण्यात आलेला नाही. ही या महाराष्ट्रातील सरकारी रास्त भाव दुकानदारांची शोकांतिका आहे.

# पोलीस निरीक्षकाची कॉलर पकडणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल


**दैनिक युवक आधार**

**नविन पनवेल वार्ताहर :** पोलीस निरीक्षकाची कॉलर पकडून शिवीगाळ करणाऱ्या कसळखंड येथील स्वप्नील गायकरला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा दाखल केला. पनवेल पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मतदानाची मोजणी पनवेल शहरातील व्हीके हायस्कूल केंद्रावर सुरू होती. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात या ठिकाणी गर्दी केली होती. भाजपच्या उमेदवारांचा विजय होत असल्याने मोठ्या प्रमाणात गुलाल उधळण सुरू होती. यावेळी अनेकांनी फलक फडकवले. यावेळी कशी जिरवली पुन्हा भेटू 2031 च्या निवडणुकीत हा आक्षेपार्ह फलक पोलिसांनी ताब्यात घेतला. यावेळी स्वप्निल गायकर याला पोलिसांनी घोषणा देण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला मात्र त्याने पोलिसांसोबत हुज्जत घातली. यावेळी खारघर येथील पोलीस निरीक्षक सुरज पाटील यांची कॉलर धरून त्यांना धक्काबुक्की तसेच शिवीगाळ करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी स्वप्निल गायकर याला ताब्यात घेतले आणि त्याच्या विरोधात 9 फेब्रुवारी रोजी बीएनएस कलम 132, 352 अंतर्गत गुन्हा दाखल केला.

# पिंजऱ्यातील बिबट्यांचा जीव टांगणीला, १९ बिबट्यांच्या तातडीने पुनर्वसनाची जीवदया फाउंडेशनची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील बिबट-मानव संघर्ष रोखण्यासाठी वनविभागाने राबवलेल्या मोहिमेत जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्यांची अवस्था सध्या अतिशय दयनीय झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील वनक्षेत्रात गेल्या दोन महिन्यांपासून १९ बिबटे अत्यंत छोट्या पिंजऱ्यांत कैद असून, त्यांच्या तातडीने पुनर्वसनासाठी बीड जिल्ह्यातील कडा येथील जीवदया फाउंडेशनने केंद्र आणि राज्य सरकारकडे धाव घेतली आहे.



**काय आहे नेमके प्रकरण?**

वनविभागाने सुरक्षिततेचा उपाय म्हणून विविध भागांतून बिबट्यांना जेरबंद केले आहे. मात्र, पकडल्यानंतर त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करण्याऐवजी त्यांना दोन महिन्यांपासून एकाच जागी पिंजऱ्यात कोंडून ठेवण्यात आले आहे. या बिबट्यांना हालचालीसाठी पुरेशी जागा नसल्याने आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे गरम झालेल्या पिंजऱ्यांमुळे ते जखमी होत आहेत. यातील एका आजारी बिबट्याला उपचारासाठी नाशिक येथील वन्यजीव रेस्क्यू सेंटरमध्ये हलवण्यात आले आहे.

**फाउंडेशनच्या मुख्य मागण्या आणि चिंता**

अमानवीय वागणूक: बिबट्यांना छोट्या पिंजऱ्यात दीर्घकाळ ठेवणे हे अमानवीय असून, ते सतत आक्रोश करत आहेत.

**गर्भवती बिबट्यांची शक्यता:** जेरबंद केलेल्या बिबट्यांपैकी काही मादी बिबट्या गर्भवती असण्याची दाट शक्यता असून, पिंजऱ्यातच पिल्ले झाल्यास त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

**तातडीने पुनर्वसन:** या मुक्या प्राण्यांची पिंजऱ्यातून सुटका करून त्यांचे राखीव वनक्षेत्र, अभयारण्य किंवा सुरक्षित आश्रयस्थानांत तातडीने पुनर्वसन करावे.

या संदर्भात जीवदया फाउंडेशनने केंद्रीय पर्यावरण व वनमंत्री भूपेंद्र यादव आणि महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्यासह वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन दिले आहे.



**स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी महायुतीच्या रायगड जिल्हा परिषदेच्या व पनवेल महाड माणगाव श्रीवर्धन तालुक्यातील निवडून आलेल्या महायुतीच्या पंचायत समितीच्या उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन केलेले आहे . महेश साळुंखे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये महायुतीला जाहीर पाठिंबा दर्शविलेला होता . स्वाभिमानी पक्षाच्या सर्व रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केलेला होता. महायुतीचे रायगड जिल्ह्यातील नेते लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन विजयी उमेदवारांचे अभिनंदन केलेले आहे.**

**( दैनिक युवक आधार )**

# लेखी कबुली कागदावरच! रस्ता नाही; जेसीबीचा थरार, जाब विचारताच ग्रामस्थांवर शिवीगाळ

## विष्णूनगर, गट नं. 146 मधील प्रकार; वनखात्याची परवानगी कुठे? शासकीय नाला अरुंद, ५० वर्षांची चिंच जमीनदोस्त

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** विष्णूनगर परिसरातील गट नंबर १४६ मध्ये ग्रामस्थांच्या दळणवळणासाठी रस्ता देण्याबाबत सन २०१९ मध्ये १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लेखी कबुली देण्यात आली होती. या करारावर शिवाजी कारभारी घायाळ व ग्रामस्थांची स्वाक्षरी असूनही प्रत्यक्षात आजपर्यंत रस्ता देण्यात आलेला नाही. त्यामुळे रस्त्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, आज गट नंबर १४६ मध्ये जेसीबीच्या साह्याने शासकीय नाल्यावर मनमानी कारवाई करण्यात आली. या कारवाईत नाल्याची रुंदी कमी करत तो बेकायदेशीरपणे अरुंद करण्यात आला. विशेष म्हणजे या कारवाईदरम्यान नाल्याच्या कडेला असलेले सुमारे ५० वर्षांचे चिंचेचे झाड पूर्णपणे उध्वस्त



करण्यात आले. या वृक्षतोडीसाठी वनखात्याची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या प्रकाराबाबत जाब विचारण्यासाठी ग्रामस्थ घटनास्थळी गेले असता शिवाजी कारभारी घायाळ व अनंता माधव घायाळ यांनी ग्रामस्थांशी शिवीगाळ व उद्धट वर्तन केले, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. लेखी कराराचा भंग करून उलट ग्रामस्थांवर दादागिरी केली जात असल्याने परिसरात संतापाची लाट पसरली आहे.

या संपूर्ण प्रकरणाबाबत ग्रामस्थांनी मंडळ अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज सादर केला होता. तसेच घटनेच्या दिवशी व त्यानंतरही वारंवार फोनद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मंडळ अधिकारी घटनास्थळी आले नाहीत, तसेच ग्रामस्थांना उडवा-उडवीची, टाळाटाळ करणारी उत्तरे मिळाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

लेखी कराराचा भंग, शासकीय नाल्यावर बेकायदेशीर जेसीबी कारवाई, वनखात्याची परवानगी न घेता वृक्षतोड, ग्रामस्थांशी शिवीगाळ आणि तक्रार करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी न फिरकणे—या सर्व बाबींमुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन याप्रकरणी तातडीने दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करणार का, की नेहमीप्रमाणे उशिरा जागे होणार, असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

**घटनास्थळी येऊन रस्त्याचा विषय मार्गी लावणार**

**प्रतिक्रिया :- मंडळ अधिकारी संतोष डुंबरे**

**शिवाजी घायाळ यांनी चिंचेचे झाड काढण्यासाठी आमच्याकडून कोणतीही परवानगी घेतलेली नाही मी स्वत: येऊन तिथे पाहणी करून कारवाई करण्यात येईल**

**प्रतिक्रिया:- विजय दौंडे वनरक्षक येवला**

# रायगड ZP-PS निकालाने राजकीय भूकंप: शिंदे गट 21 ने अव्वल, भाजप-NCP ची 31 ने सत्ता जवळ; तटकरे गटाचा शिंदेंना धक्का?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा निकाल जाहीर होताच जिल्ह्याच्या राजकारणात अक्षरशः भूकंप घडला. २१ जागा जिंकून सर्वाधिक मोठा पक्ष ठरलेला शिवसेना शिंदे गट सत्तेच्या दारात उभा असला तरी, राष्ट्रवादी काँग्रेस (१६) आणि भाजप (१५) या निवडणूकपूर्व युतीच्या जागांची बेरीज ३१ असल्याने बहुमताचा आकडा (३०) पार झाला आहे. म्हणजेच, सर्वाधिक जागा जिंकूनही शिंदे गट सत्तेपासून दूर राहण्याची वेळ येऊ शकते. राजकीय वर्तुळात भाजप-राष्ट्रवादी जोरदार हालचाली करून शिंदे गटाला सत्तेबाहेर ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा रंगली आहे. ही स्थिती जनतेत चर्चेचा विषय ठरली असून, "आकडे की डावपेच जिंकणार?" असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.तटकरे विरुद्ध शिंदे गट : वैयक्तिक वैराची राजकीय चिता?खासदार सुनील तटकरे, मंत्री भरत गोगावले, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्यातील तणाव सर्वश्रुत आहे. या वैयक्तिक मतभेदांचा फायदा घेत राष्ट्रवादीचे नेतृत्व शिंदे गटाला सत्तेपासून रोखण्याचा डावपेच आखत असल्याची जोरदार चर्चा आहे. राजकीय सूत्रांनी सांगितले, "सत्ता मिळवण्यापेक्षा शिंदेंना सत्ता मिळू न देणे हा सध्या काही नेत्यांचा प्रमुख अजेंडा बनला आहे." या हालचालींमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, कार्यकर्त्यांमध्ये "तटकरे गटाची सूडबुद्धी" ही चर्चा रंगली आहे. जनतेत मात्र याला "वैयक्तिक वैराने विकास थांबणार का?" असा सवाल उपस्थित होत आहे.शेतकरी कामगार पक्षाचे पूर्ण पतन : एकेकाळचे साम्राज्य शून्यावर!या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का बसला तो शेतकरी कामगार पक्षाला




(शेकाप). एकेकाळी रायगडवर निर्विवाद वर्चस्व असलेल्या या पक्षाला एकही जागा मिळाली नाही. अलिबागमध्ये महेंद्र दळवी यांचा राजकीय काटा काढण्याच्या नादात आणि भाजपला रोखण्याच्या तीव्र भावनेत शेकापने स्वतःचाच पाया हादरवला, अशी तीव्र प्रतिक्रिया कार्यकर्त्यांतून उमटत आहे. "शेतकरी भवनातून मुख्यमंत्री" ही वल्गना करणारे पक्ष नेतृत्व आज खामोश का? हा प्रश्न पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनाच पडला आहे. जनतेत "शेकापचा अंत झाला का?" ही चर्चा जोर धरली असून, पक्षाच्या भविष्याबाबत शंका व्यक्त होत आहे.

"अध्यक्षपदाची समीकरणे उलटसुलट" : मानसी दळवींचे स्वप्न अधांतरी शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी भरघोस मताधिक्याने विजयी झाल्या आणि अध्यक्षपदाच्या प्रमुख दावेदार ठरल्या. मात्र, नव्या राजकीय समीकरणांमुळे त्यांचे स्वप्न सध्या तरी लांबNi गेले आहे. भाजप-राष्ट्रवादीची सत्ता स्थापन "काळ्या दगडावरची रेघ" वाटत असली तरी, ते इतर घटकांची चाचपणी करत असल्याचे सूत्र सांगतात. सत्तेबाहेर राहिल्यास शिंदे गट आक्रमक विरोधी पक्ष म्हणून उभा राहील, अशी अपेक्षा आहे. जनतेत "रायगडमध्ये आता खरी निवडणूक सुरू झाली" ही चर्चा रंगली असून, विकासकामांचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे.तालुकानिहाय चित्र : शिंदे गटाची लाट, राष्ट्रवादी-भाजपचा प्रतिकारअलिबाग : ७ पैकी ६ शिंदे, १ राष्ट्रवादीमहाड : ५ पैकी ५ शिंदेपोलादपूर : २ पैकी २ शिंदेमुरुड : २ पैकी २ शिंदेरोहा : २ शिंदे, २ राष्ट्रवादीमाणगाव : २ शिंदे, २ राष्ट्रवादीतळा/श्रीवर्धन/म्हसळा : राष्ट्रवादी वर्चस्वपनवेल : भाजपचा झेंडाउरण : काँग्रेस-उबाठा उपस्थितीअंतिम आकडे जाहीरशिवसेना (शिंदे) : २१राष्ट्रवादी काँग्रेस : १६भाजप : १५शिवसेना (उद्धव) : ५,काँग्रेस : २,शेकाप : ०,रायगडच्या राजकारणात आकडे बोलत असले तरी डावपेचच वर्चस्व गाजवणार, की जनतेच्या मताची लाट जिंकणार? ही खरी लढत आता सुरू झाली असून, सत्तास्थापनेची चर्चा जोरात चालू आहे.

## काटेकोर नियोजनातून द्राक्षशेतीत यशस्वी वाटचाल

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी/ योगेश कर्डिले** : परंपरागत शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत द्राक्षशेतीत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या निफाड तालुक्यातील सोनेवाडी (बु.) येथील सागर निचीत या प्रगतिशील तरुण शेतकऱ्याची यशोगाथा आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. बी.एस्सी. शिक्षण पूर्ण केल्यानंतर वडिलांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेतीची सूत्रे हाती घेतली आणि आज द्राक्षशेतीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सागर निचीत यांच्याकडे एकूण १२ एकर जमीन असून त्यापैकी ६ एकर क्षेत्रावर द्राक्षांची लागवड करण्यात आली आहे. थॉम्पसन सीडलेस, अनुष्का, १५३० व्होलकणी यांसारख्या उच्च दर्जाच्या जातींची निवड करून गुणवत्तापूर्ण उत्पादनावर त्यांनी भर दिला आहे. वडिलांनी १९९९ साली सुरू केलेली द्राक्षशेती त्यांनी आधुनिक पद्धतीने विकसित केली असून गेल्या ९ ते १० वर्षांपासून ते स्वतः सक्रियपणे शेती करत आहेत.

पीपीएफ फार्मच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे आणि यशस्वी द्राक्ष उत्पादकांच्या अनुभवातून त्यांना द्राक्षशेतीची प्रेरणा मिळाली. योग्य



रूटस्टॉकची निवड, संतुलित स्पेसिंग, सर्राईंगल पद्धतीचे ट्रेनिंग व छाटणी तसेच ठिबक सिंचनाचा प्रभावी वापर हे त्यांच्या यशाचे प्रमुख गमक ठरले आहे.

शेतीत ऑरगॅनिक व इनऑर्गॅनिक खतांचा संतुलित वापर, दरवर्षी माती परीक्षण आणि आवश्यकतेनुसार पीजीआरचा योग्य वापर केला जातो. कृषी तज्ज्ञ, प्रशिक्षण शिबिरे आणि केव्हीकेमार्फत सातत्याने घेतलेल्या मार्गदर्शनामुळे उत्पादनात सातत्य राखणे शक्य झाले आहे.सध्या एकरी सरासरी ९ ते ११ टन प्रीमियम दर्जाचे द्राक्ष उत्पादन मिळत असून २ ते ३ टन उत्पादन स्थानिक बाजारात विक्रीसाठी जाते. चांगल्या हंगामात उत्पादन ११ ते १२ टनांपर्यंत पोहोचते. हेक्टरी सुमारे ६ ते ७ लाख रुपये खर्च येत असून अनुकूल परिस्थितीत हेक्टरी १२ ते १३ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. बहुतांश द्राक्षे निर्यातीसाठी जात असून ब्रिटनसारख्या देशांमध्ये त्यांची निर्यात केली जाते.

द्राक्षशेतीमुळे त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या सुधारली आहे. उत्पन्नात वाढ होऊन घर, जमीन तसेच आधुनिक शेती यंत्रसामग्री अशी स्थावर मालमत्ता उभी राहिली आहे.

नवीन द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सागर निचीत म्हणतात,

“द्राक्षशेतीत यश मिळवायचे असेल तर शंभर टक्के लक्ष, काटेकोर पाणी नियोजन आणि योग्य व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. ही त्रिसूत्री पाळली तर द्राक्षशेती निश्चितच फायदेशीर ठरते.”

कृषिकन्यांकडून यशोगाथेचा अभ्यास

दरम्यान, मविप्र संचलित कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषी महाविद्यालय, चाचडगाव येथील विद्यार्थिनींनी या यशोगाथेचा अभ्यास केला. प्रा. एस. बी. सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली आहेर गायत्री, बैरागी वसुधा, बानकर गायत्री, बोरसे हर्षदा, चांदगुडे मुक्ता व हिरल चौधरी यांनी द्राक्षबागांची पाहणी करून उत्पादन व्यवस्थापन, अडचणी आणि यशाचे घटक यांचा सखोल अभ्यास केला.

योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर शेतीतूनही समृद्धी साधता येते, हा ठोस संदेश या यशोगाथेतून मिळतो.

## भयमुक्त परीक्षा

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांना भयमुक्त व आत्मविश्वासपूर्ण वातावरण मिळणे गरजेचे आहे. अभ्यास, योग्य मार्गदर्शन, पालक-शिक्षकांचा सकारात्मक सहभाग आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समतोल साधल्यास विद्यार्थी निर्धास्तपणे परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करतील.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते. खोडकर मित्रांचा नाद सोडून चांगल्या मित्रांच्या सहवासात राहावे. मोबाईलला चार हात दूर ठेवावे. आवश्यक कामासाठी मोबाईलचा वापर करावा. याचा परिणाम परीक्षेची तयारी झाल्याने विद्यार्थी हसत हसत आनंदाने परीक्षेला जातात.

बरेच विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा केल्याने परीक्षेच्या कालावधीत मानसिक तणावाखाली दिसतात. याचा परिणाम आपण काय करावे काय करू नये याचा विचार करीत विद्यार्थी असतात. अशावेळी त्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी किंवा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे गरजेचे आहे.

# देशातील पहिल्या क्लायमेट वीकचे मुंबईत आयोजन

## बिल गेट्स, सचिन तेंडुलकर, हिलरी क्लिंटन, नोएल टाटा, नादिर गोदरेज, रोहिणी निलेकणी यांची उपस्थिती

**मुंबई :** मुंबईत पहिल्यांदाच 17 ते 19 फेब्रुवारी 2026 दरम्यान मुंबई क्लायमेट वीक (एमसीडब्लू) चे आयोजन करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उपक्रमादरम्यान मुंबई हे ग्लोबल साऊथमधील हवामान नेतृत्वाचे प्रमुख व्यासपीठ ठरणार आहे. या काळात भारत आणि जगभरातील सरकारप्रमुख, उद्योगजगतातील मान्यवर, हवामान क्षेत्रातील नवोन्मेषक, दानशूर संस्था, युवक तसेच स्थानिक समुदायांचे प्रतिनिधी एकत्र येऊन हवामान विषयक चर्चेपासून प्रत्यक्ष कृतीकडे वाटचाल करतील.

मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे असलेल्या मध्यवर्ती केंद्रामार्फत करण्यात येणार असून, त्याचबरोबर शहरभर विविध शैक्षणिक संस्था, वसाहती आणि सांस्कृतिक ठिकाणी कार्यक्रमांचे जाळे उभारण्यात येणार आहे. या उपक्रमांमधून प्रत्यक्ष अंमलात आणता येतील अशा हवामान उपाययोजनांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे.

हवामानावरील ही जागतिक पातळीवरील चर्चा पुरस्कारप्राप्त स्वयंसेवी संस्था प्रोजेक्ट मुंबई यांच्या नेतृत्वाखाली होत असून, महाराष्ट्र शासन, पर्यावरण व हवामान बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे या सप्ताहास सहकार्य लाभले आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथमधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची ‘लाईव्ह टेस्ट बेड’ म्हणून स्थान दिले जात आहे.

मुंबई क्लायमेट वीकविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “मुंबई क्लायमेट वीकद्वारे हवामान बदलावर कृती करण्याचा भारताचा ठाम निर्धार शहर पातळीपासून जागतिक स्तरापर्यंत अधोरेखित होतो. भारत आणि जगभरातील सरकारे, उद्योग, वित्तसंस्था, तज्ज्ञ आणि युवक मुंबईत एकत्र येत असताना, महाराष्ट्र आपल्या नागरिकांसाठी आणि ग्लोबल साऊथमधील देशांसाठी अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सक्षम भविष्यासाठी सर्व भागीदारांसोबत काम करण्यास तयार आहे, असा स्पष्ट संदेश यातून दिला जात आहे.”

प्रोजेक्ट मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक शिशिर जोशी म्हणाले, “मुंबई ही नेहमीच जिद्द आणि कल्पकतेसाठी ओळखली जाणारी नगरी आहे आणि मुंबई क्लायमेट वीकमध्ये हीच ऊर्जा हवामान संकटाशी मोठ्या प्रमाणावर भिडताना दिसेल. ही भारतातील पहिली अशा स्तरावरील नागरिकांच्या नेतृत्वाखालील हवामान चळवळ आहे, जिथे मंत्री, उद्योगजगतातील नेते आणि तज्ज्ञ हे विद्यार्थी, प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी आणि परिसरातील स्वयंसेवक यांच्यासोबत एकाच व्यासपीठावर सहभागी होतील. यामुळे ग्लोबल साऊथमधील हवामान नेतृत्व प्रत्यक्षात कसे असते, हे मुंबई दाखवून देईल.”

**हब-अँड-स्पोक मॉडेल**

मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे करण्यात येत आहे. जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवसांचा मुख्य कार्यक्रम होणार असून, त्यात नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, एमसीडब्लू इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र असणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील नेतृत्व पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे.

याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये स्पोक कार्यक्रम सुरू असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

18 फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे.

**विविध संस्थांची भागीदारी**

मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.

वातावरण हे मुंबई क्लायमेट वीकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि भावना मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

एव्हरसोर्स कॅपिटल, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट इंडिया, क्लायमेट ग्रुप, C40, महिंद्रा ग्रुप, इंडियन मर्चंट्स चेंबर यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे. युनिसेफच्या युवाह (YuWaah!) या उपक्रमाद्वारे युवक सहभाग भागीदार असणार आहे.

याशिवाय 30 हून अधिक देशांतील प्रतिनिधी, केंद्र व राज्य सरकारांचे नेते, बहुपक्षीय संस्था, वित्तसंस्था, उद्योग, दानशूर संस्था, नागरी समाज, शैक्षणिक क्षेत्र आणि युवक नेटवर्क्स यांचा सहभाग अपेक्षित आहे. या परिषदेचे यश निधी मिळालेल्या उपाययोजना, तयार झालेल्या भागीदाऱ्या, प्रभावित धोरणे आणि सशक्त झालेल्या समुदायांद्वारे मोजले जाणार आहे.

**जागतिक व राष्ट्रीय नेतृत्व**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये हवामान धोरण, वित्त, उद्योग आणि नागरी समाजातील आंतरराष्ट्रीय व भारतीय नेतृत्व सहभागी होणार आहे. आंतरराष्ट्रीय वक्त्यांमध्ये हिलरी क्लिंटन, बिल गेट्स, रॉकीफेलर फाउंडेशनचे प्रतिनिधी राजीव शाह, आयएफसी (वर्ल्ड बँक समूह) दक्षिण आशियाचे प्रादेशिक संचालक इमाद फखुरी, एन्व्हायर्नमेंटल डिफेन्स फंडच्या कार्यकारी संचालक अमांडा लेलँड आणि अलाइड क्लायमेट पार्टनर्सच्या वरिष्ठ सल्लागार क्लॅरिसा डी फ्रँको यांचा समावेश आहे.

भारतीय सार्वजनिक क्षेत्रातून केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शहर आणि प्रादेशिक नेतृत्वाचाही सहभाग असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण सचिव जयश्री भोज, परराष्ट्र मंत्रालयाचे संयुक्त सचिव डॉ. अक्विनो विमल तसेच केंद्र शासनाचे माजी सचिव सी. के. मिश्रा यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग व वित्त क्षेत्रातून अमित चंद्रा (बेन कॅपिटल), अंकुर गुप्ता (ब्रुकफिल्ड), व्ही. वैद्यनाथन (आयडीएफसी बँक), जामशेद गोदरेज, नादिर गोदरेज, अंजली रवीकुमार (झोमॅटो), प्रतीक अग्रवाल (सेरेंटिका रिन्युएबल्स) आणि समीर सिसोदिया (रेनमॅटर फाउंडेशन) सहभागी होणार आहेत.

दानशूर आणि ज्ञान परिसंस्थेचे प्रतिनिधित्व रोहिणी निलेकणी, सौम्या स्वामिनाथन, मनोज कुमार, सत्यजित भटकळ, मृदुला रमेश, सीमा पॉल, शिशिर सिन्हा, डॉ. वीणा श्रीनिवासन आणि इतर संशोधन व प्रभाव क्षेत्रातील नेते करतील.

पर्यावरण विषयासाठी काम करणाऱ्या भारतीय चित्रपटसृष्टीतील व्यक्तींमध्ये दिया मिर्झा आणि भूमी पेडणेकर यांचा सहभाग असेल.

**तीन मुख्य स्तंभ आणि विषय भागीदार**

मुंबई क्लायमेट वीकचा कार्यक्रम अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या तीन मुख्य स्तंभांवर आधारित आहे. अन्न प्रणाली स्तंभाचे नेतृत्व इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह करत असून, ऊर्जा संक्रमणासाठी शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, एव्हरसोर्स कॅपिटल आणि आयएसईजी फाउंडेशन यांचे सहकार्य आहे. शहरी लवचिकता विषयाचे नेतृत्व वारी (डब्लूआरआय) इंडिया करत असून, एचटी पारेख फाउंडेशन आणि इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह हे विषय भागीदार आहेत.